रविवार, २५ डिसेंबर २०२३, सकाळी ५.४५ मि.
स्थळ : नेहरू मैदान राजकमल चौक, अमरावती
2023
अटल दौड
नोंदणी : १ डिसेंबर ते १५ डिसेंबर २०२३
ऑनलाईन नोंदणी करिता वेबसाईट www.ataldaud.com
: संपर्क :
9823355012, 9764198986, 9372790281, 9888111918
9552577778, 7276819739, 7709800058

RNI No. - MAHMAR 2023/84526

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com

❑ वर्ष - १ ❑ अंक -२४७ ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि.०४ डिसेंबर २०२३ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## पराभवाचा राग संसदेत काढू नका, आता तरी सुधरा; पंतप्रधान मोदींचा विरोधकांवर निशाणा

**दि.४विदर्भ प्रजासत्ताक नवी दिल्ली**

आज संसदेच्या हिवाळी अधिवेशनाला सुरुवात होत आहे. त्याआधी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विरोधकांवर निशाणा चढवला आहे. पराभवाचा राग संसदेत काढू नका, अशा शब्दात पंतप्रधान मोदी यांनी विरोधकांवर टीकास्त्र डागलं आहे. चार राज्यांच्या विधानसभा निवडणुकीच्या निकालाबाबत पंतप्रधान मोदी यांनी मीडियाला प्रतिक्रिया दिली आहे. देशातील जनतेनं नकारात्मकतेचा पराभव केला आहे, अशा शब्दात मोदींनी विरोधकांच्या पराभवावर निशाणा साधला आहे. चार राज्यांच्या निवडणुकीत भाजपने तीन राज्यांत



दमदार विजय मिळवला आहे, तर काँग्रेसला एका ठिकाणी सरकार स्थापन करता येणार आहे.

विरोधकांच्या पराभवावर निशाणा साधताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, निवडणुकीत ज्यांच्या पराभव झाला आहे, त्यांनी संसदेत त्यांचा राग दाखवू नका. पंतप्रधानांनी पुढे म्हटलं की, लोकशाहीमध्ये पक्ष आणि विपक्ष समान आहे. राजकारणात जनतेचं हित विसरू नका. हा निवडणुकीचा निकाल सकारात्मक पद्धतीने जनतेसमोर आणा, असं आवाहन पंतप्रधानांनी राजकीय विश्लेषकाना केलं आहे.

विधानसभा निवडणुकीत भाजपला मध्य प्रदेश, छत्तीसगड आणि राजस्थानमध्ये दमदार विजय मिळाला आहे, तर काँग्रेसला तेलंगणामध्ये विजय मिळाला आहे. तीन राज्यांतील विजयानंतर पंतप्रधान मोदी यांनी म्हटलं की, ''काही लोक याला सरकार समर्थक सुशासन किंवा पारदर्शकता म्हणतात, हे देशात दिसून येत आहे. देशाने नकारात्मकता नाकारली आहे, लोकांच्या आकांक्षा बळकट करण्यासाठी लोकशाहीचं मंदिर महत्त्वाचं व्यासपीठ आहे. मी सर्व सदस्यांना विनंती करतो की, त्यांनी तयार राहून संसदेत मांडलेल्या विधेयकांवर सखोल चर्चा करावी.''

### सुधरा, नाहीतर जनताच तुम्हांला साफ करेल

पंतप्रधान मोदी यांनी विरोधकांवर निशाणा साधताना म्हटलं की, शिवीगाळ, निराशा आणि नकारात्मकता घमंडिया आघाडीसाठी हेडलाईन्स बनू शकतात, पण जनतेच्या मनात स्थान देऊ शकत नाही. पंतप्रधान मोदी यांनी विरोधाकांना इशारा देत म्हटलं आहे की, ''सुधरा, नाहीतर जनताच तुम्हांला साफ करेल. हा निकाल काँग्रेस आणि त्यांच्या आघाडीसाठी मोठा धडा आहे.काही घराणेशाहीचे लोक एकत्र एका मंचावर आल्याने फक्त चांगला फोटो येऊ शकतो, पण देशाचा विश्वास जिंकू शकत नाही. देशातील जनतेचं मन जिंकण्यासाठी राष्ट्रसेवा करणं गरजेचं आहे.''

### देशात राजकीय वातावरण तापलं

पंतप्रधान मोदी यांनी म्हटलं आहे की, ''देशातील वातावरणात हळूहळू थंडी वाढत असली तरी, राजकीय वातावरण मात्र तापलं आहे. चार राज्यांच्या विधानसभा निवडणुकांचे निकाल उत्साह दाखवणारे आणि देशाचे भविष्य निश्चित करणारे आहेत. चांगल्या जनादेशानंतर आम्ही संसदेच्या मंदिरात भेटत आहोत. मी सर्व खासदारांना सकारात्मक विचार घेऊन संसदेत यावे, असं आवाहन करतो. बाहेरच्या पराभवाचा राग संसदेत आणू नका. लोकशाहीच्या मंदिराला स्टेज बनवू नका. देशाला सकारात्मकतेचा संदेश द्या.''

## मिझोरममध्ये झोराम पीपल्स मूव्हमेंटनला स्पष्ट बहुमत

**दि.४विदर्भ प्रजासत्ताक मिझोरम**

देशातील ४ पैकी तीन राज्यात भाजपने सत्ता काबिज केल्यानंतर उर्वरीत मिझोरमच्या निकालाकडे आज सर्वांचे लक्ष लागले होते. सकाळी ८ वाजल्यापासून पोस्टल मतदानाचे निकाल समोर आले. त्यानंतर, आता ईव्हीएम मतमोजणीला सुरुवात झाल्यानंतर दोन तासांतच येथील जनतेचा कौल समोर आला. राज्यात स्थानिक पक्षांचं वर्चस्व निकालात स्पष्ट होत असून झोराम पीपल्स मूव्हमेंटने स्पष्ट बहुमत मिळवले आहे. झेडपीएमचे प्रमुख लालदुहोमा यांच्या पक्षाने २० जागांवर विजय मिळवला असून ७ जागांवर त्यांचे उमेदवार आघाडीवर आहेत. म्हणजेच, त्यांनी ४० पैकी आवश्यक बहुमताचा आकडा गाठला आहे.

मिझोरममध्ये काँग्रेसला अपेक्षित यश मिळाला नसून गतवर्षीच्या तुलनेत यंदा काँग्रेसच्या जागा घटल्या आहेत. केवळ एका जागेवर काँग्रेस उमेदवार आघाडीवर आहे. तुलनेत भाजपचे २ उमेदवार निवडून आले आहेत. येथील सत्ताधारी मिझो नॅशनल फ्रंटला सत्तेतून पायउतार व्हावे लागले. एमएनएफने केवळ ७ जागा जिंकल्या असून ३ जागांवर त्यांचे उमेदवार आघाडीवर आहेत. त्यामुळे, येथे लालदुहोमा यांच्या झोराम पीपल्स मूव्हमेंटचे सरकार स्थापन होणार हे निश्चित झाले आहे.

मिझोरममध्ये मतमोजणी सुरू असतानापासूनच, ७४ वर्षीय माजी आयपीएस अधिकारी लालदुहोमा आणि त्यांचा पक्ष, झोरम पीपल्स मूव्हमेंट यांच्यावर साऱ्यांचे लक्ष होते. एक्झिट पोलने मिझोराममध्ये ZPM ला बहुमत मिळेल असा अंदाज वर्तवला होता. तोच अंदाज खरा होताना दिसत आहे.

## सात वेळा आमदार राहिलेला मंत्री पराभूत; समाजाच्या एकीमुळे शेतकरी बनला 'भाजपा'चा आमदार

**दि.४विदर्भ प्रजासत्ताक रायपूर**

लोकसभा २०२४ च्या सेमी फायनलमध्ये अर्थात ४ राज्यांतील विधानसभा निवडणुकीत भाजपाने ३-१ असा विजय मिळवला. मध्य प्रदेश, राजस्थान आणि छत्तीसगडमध्येभाजपानं स्पष्ट बहुमत मिळवलं. तर तेलंगाणात केसीआर यांच्या पक्षाचा पराभव झाला अन् जनतेनं सत्तेच्या चाव्या काँग्रेसकडं सोपवल्या. राजस्थानच्या जनतेनं आपली परंपरा कायम राखत सत्ताबदल केला. खरं तर १९९० पासून राजस्थानात एकदाही एका पक्षाला सलग दोनदा सत्ता मिळवता आलेली नाही. मात्र, छत्तीसगडच्या निकालानं सर्वांना धक्का दिला. कारण भूपेश बघेल यांची प्रचंड लोकप्रियता असताना देखील काँग्रेसला सत्तेतून पायउतार व्हावं लागलं.



दंगलीत 'लेका'ला गमावणारा
शेतकरी झाला आमदार

दरम्यान, छत्तीसगडमधील बेमेतरा जिल्ह्यातील साजा विधानसभा मतदारसंघात अत्यंत चुरशीची लढत पाहायला मिळाली. इथं भाजपा आणि काँग्रेस यांच्यात थेट लढत होती. पण, एका सामान्य कुटुंबातील शेतकरी ईश्वर साहू यांनी सात वेळा आमदार राहिलेल्या उमेदवाराचा पराभव करून मोठा धक्का दिला. या जागेवरून साहू यांच्याविरोधात मंत्री रविंद्र चौबे मैदानात होते. खरं तर दुसऱ्या समुदायाच्या जमावाने केलेल्या हिंसाचारात साहू यांनी आपल्या 'लेका'ला गमावले. साहू यांच्या मुलाची निघृण हत्या केल्यामुळं जनतेत संतापाची लाट होती, ज्याचेच परिणाम निकालात दिसून आले.

### ईश्वर साहू यांचा विजय

भारतीय जनता पक्षानं जनतेचा आक्रोश पाहून ईश्वर साहू यांना तिकिट दिलं. साहू यांनी एकूण १०१७८९ मतं मिळवली आणि चौबे यांना ५१९६ मतांनी पराभवाची धूळ चारली. साजा विधानसभा मतदारसंघात एप्रिलमध्ये धार्मिक दंगली झाल्या होत्या. शाळेतील भांडणापासून सुरू झालेल्या या दंगलीने धार्मिक हिंसाचाराचं रूप घेतलं. वाद वाढल्यानं हिंसाचाराची आग सर्वत्र पसरली. घरं जाळण्यात आली, निष्पापांना नाहक त्रास सहन करावा लागला. याच हिंसाचारात ईश्वर साहू यांचा मुलगा भुवनेश्वर साहू याची हत्या करण्यात आली. मग भाजपाने मृत भुवनेश्वरच्या वडिलांना तिकिट दिलं आणि ते आमदार बनले.

## महाराष्ट्रात 'गुलाबी चित्र' करण्याच्या नादात 'बीआरएस'चं पानिपत

**दि.४विदर्भ प्रजसत्ताक**

देशव्यापी नेतृत्वाचे स्वप्न तसेच पक्षाचे नाव तेलंगणा व्हाया महाराष्ट ते भारत अशी राजकीय वाटचाल सुरु केलेल्या के. चंद्रशेखर राव यांना तेलंगणात मतदारांनी जमिनीवर आणलं आहे. तेलंगणात हॅट्रिकच्या तयारीत असलेल्या केसीआर यांना काँग्रेसने रेवंत रेड्डी यांच्या नेतृत्वात तगडा झटका देत सत्ता आणली आहे. कर्नाटकात विजय मिळवल्यानंतर काँग्रेसने सर्वाधिक लक्ष तेलंगणात केले होते. मात्र, देशव्यापी नेतृत्वाची स्वप्ने



पडलेल्या केसीआर यांना त्यांची जाणीव नव्हती. इतकंच नव्हे, तर गेल्या दोन वर्षांपासून महाराष्ट्रात पाय रोवण्यासाठी सर्वाधिक शक्ती खर्च केली. तब्बल ७०० गाड्यांचा ताफा घेऊन पंढरपूरला येत केसीआर यांनी महाराष्ट्रात जोरदार तयारी सुरु केली होती. मात्र, आता तेलंगणात पराभव झाल्याने विशेष करून महाविकास आघाडीचा जीव भांड्यात पडला आहे असे म्हटल्यास राजकीय अतिशयोक्ती ठरणार नाही.

केसीआर यांनी तेलंगणानंतर सर्वाधिक लक्ष महाराष्ट्रत केंद्रित केले होते. दैनिकांसह त्यांनी टीव्हींना जाहिराती देत राज्यात दौऱ्यावर दौरे केले होते. त्यामुळे केसीआर यांचा झगमटामागे कोणती राजकीय अदृश्य शक्ती काम करत आहे याचीच चर्चा रंगली होती. महाराष्ट्र विधानसभेच्या सर्व जागा लढवण्यासाठी त्यांनी शक्ती पणाला लावली होती. सर्व मतदारसंघात त्यांनी निरीक्षक सुद्धा नेमण्याची सुरुवात केली होती. इतकेच नव्हे, तर मराठवाड्यासह पश्चिम महाराष्ट्रात शिरकाव करण्यासाठी शेतकरी चळवळ हेरण्यासाठी त्यांनी रघुनाथदादा पाटील यांनाही पक्षात घेतले होते. राजू शेट्टी यांनाही गळ टाकण्याचा प्रयत्न केसीआर यांनी केला होता. मात्र, त्यांनी नकार दिला. त्यांचा कोल्हापूर आणि सांगली दौराही झाला होता. मात्र, त्यांना अपेक्षित मायलेज मिळाले नव्हते. भगीरथ भालके यांनीही केसीआर यांच्या पक्षात प्रवेश केला होता.

## 'मिचौंग' चक्रीवादळमुळे तामिळनाडूत मुसळधार पाऊस, रस्त्यावरील कार वाहू लागल्या

**दि.४ विदर्भ प्रजासत्ताक चेन्नई १८**

भारतीय किनारपट्टीवर 'मिचौंग' चक्रीवादळ सुरु झाले आहे. या चक्रीवादळामुळे तामिळनाडूत मुसळधार पाऊस सुरु आहे. रस्ते पाण्यात गेले आहे. रस्त्यांवर असलेल्या गाड्या पाण्यात वाहून जात आहे. लोकांना घराबाहेर न पडण्याची सूचना देण्यात आल्या आहेत. सरकारने सार्वजनिक सुटी जाहीर केली आहे. विमानतळ पाण्यात बुडाले आहे. यामुळे अनेक विमानसेवा रद्द करण्यात आल्या आहेत. पावसामुळे राज्यात दोन जणांचा मृत्यू झाला आहे. चक्रीवादळ पाच डिसेंबर रोजी आंध्र प्रदेशातील किनारपट्टीवर धडकण्याची शक्यता आहे. या वादळामुळे किनारपट्टीवर ११० किलोमीटर वेगाने वारे वाहणार आहे.



### लोकांना घराबाहेर न पडण्याचा सूचना

ग्रेटर चेन्नई कॉर्पोरेशनच्या परिसरात ३५ ते ८० किमी वेगाने वारे वाहत आहे. यामुळे लोकांना घराबाहेर न पडण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. आपत्कालीन परिस्थितीसाठी १९१३ हा क्रमांक राज्य सरकारने दिला आहे. राज्यात मंगळवारीसुद्धा मुसळधार पावसाचा इशारा भारतीय हवामान विभागाने दिला आहे. हवामान विभागाचे उपमहानिदेशक बालचंद्रन यांनी म्हटले की, चेन्नई, चेंगलपट्टू आणि कांचीपूरम जिल्ह्यासाठी रेड अलर्ट दिला आहे. या भागांत अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे. चेन्नईमधील शहरवाहतूक बंद करण्यात आली आहे. मुसळधार पावसामुळे बससेवा बंद करावी लागत असल्याचे प्रशासनाने म्हटले आहे.

मंगळवारी जास्त धोकाचक्रीवादळ पाच डिसेंबर रोजी आंध प्रदेशातील किनारपट्टीवर धडकणार आहे. त्यावेळी १०० ते ११० किलोमीटर वेगाने वारे वाहणार आहेत. यामुळे तामिळनाडू, आंध्र प्रदेश आणि पुडुचेरीत मुसळधार पावसाची शक्यता आहे. केंद्र शासनाने एनडीआरएफच्या २१ टीम तैनात केल्या आहेत. तसेच 'मिचौंग'चक्रीवादळामुळे ११८ रेल्वे रद्द करण्यात आल्या आहेत. एनडीआरएफची टीम तयार ठेवली आहे. राज्यात ४,९६७ बचाव शिबिर तयार केले आहे.

### विमानांचे उड्डान रद्द

पावसामुळे चेन्नई विमानतळावरुन विमानांचे उड्डान रविवारी रात्री ११ वाजेपासून बंद करण्यात आले आहे. आतापर्यंत ७० विमानांचे उड्डान रद्द केले आहे. चेन्नई महानगरपालिकेचे कर्मचारी ठिकाठिकाणी साचलेले पाणी बाहेर काढण्यासाठी प्रयत्न करत आहेत.

## नाना पटोले म्हणतात... महाराष्ट्रात काँग्रेसची लाट

**दि.४विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

महाराष्ट्राच्या सीमावर्ती भागात मध्यप्रदेश, छत्तीसगडमधील काँग्रेसचे उमेदवार मोठ्या संख्येने विजयी झाले आहेत. तर तेथे भाजपला नाकारले आहे. यावरून महाराष्ट्रात काँग्रेसची लाट असल्याचे दिसून येते, पुढील निवडणुकीत त्यांचा परिणाम दिसेल, असा दावा काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला. ते आज नागपुरात बोलत होते. जनतेचा कौल आम्हाला मान्य आहे. काँग्रेसला लोकांनी पसंती दिली



निवडणुकीतील पराभवाच्या कारणांचा अभ्यास करू आणि पुढे जाऊ. परंतु महाराष्ट्राला लागून असलेल्या जिल्ह्यातील निवडणुक निकाल बघितल्यास आहे. महाराष्ट्राच्या निवडणुकीत त्यांचा निश्चित परिणाम दिसून येईल. भाजप अधिक काळ सत्तेत राहू शकणार नाही. महाराष्ट्रातील भाजप नेत्यांनी विजयाचा आनंदोत्सव साजरा करावा की नाही, हा त्यांच्या प्रश्न आहे, असे पटोले यांनी म्हटले आहे.

## पोलीस आयुक्त नविनचंद्र रेड्डी सह वरीष्ठ अधिकाऱ्यांनी केली हनुमान गडी शिव महापुराण कथेच्या जागेची पाहणी

**दि४विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

अमरावती शहरामध्ये १५ डिसेंबर ते २० डिसेंबर२०२३ पर्यंत पंडित श्री प्रदीपजी मिश्रा यांच्या वाणीतून शिवमहापुराण कथेचे आयोजन करण्यात आले आहे या कथेमध्ये जवळपास पाच ते दहा लाख लोक भाविक भक्त येण्याचा अंदाज असल्यामुळे पोलिसांनी हनुमान गडी भानखेडा , छत्री तलाव रोड येथील जागेची, मंडप व्यवस्था







,भोजन व्यवस्था, पार्किंग व्यवस्था, जाण्याच्या रस्त्याची पाहणी केली त्यावेळी अमरावती शहराचे पोलीस आयुक्तनवीन चंद्र रेड्डी पोलीस उपयुक्त सागर पाटील सहाय्यक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे, पुंडकर सर, राजापेठ पोलीस स्टेशनच्या निरीक्षक सीमा दाताळकर फ्रेजरपुरा पोलीस स्टेशनचे गोरखनाथ जाधव बडनेरा पोलीस स्टेशनचे नितीन मगर, शहर वाहतूक शाखेचे मनिष ठाकरे यांच्यासह इतर पोलीस अधिकाऱ्यांनी जागेची पाहणी करून आयोजकांना काही सूचना दिल्या व लवकरच या आयोजना संदर्भात पुन्हा आयोजकांसोबत बसून त्यावर लवकर चर्चा करू असं त्यावेळी सांगितलं सदर पाहणी करत असताना पोलीस आयुक्त नवीन चंद्र रेड्डी यांच्यासह आयोजकसुनील राणा, परवानगी समितीचे विनोद गुहे, विजय खंडेलवाल, शेखर काळे, समाजसेवक चंद्रकुमार उर्फ लपी जाजोदिया, गोविंद गांधी, मनोज डहाके, राजू बाकडे, मिलिंद कहाळे, विनोद येवतीकर, शंकर डोंगरे, राजू लांजेवार ,दिनेश आखरे, अनिकेत जोशी, इत्यादी पोलीस कर्मचारी अधिकारी यांच्यासह आयोजन समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

संपादकीय ......

## मध्य प्रदेशात भाजपनं गड राखला

मध्य प्रदेशात भाजपनं गड राखला आणि एक्झिट पोलमध्ये दाखवणारा कल चुकीचा ठरवला. काँग्रेसचा पराभव मध्य प्रदेशात का झाला याची कारणमीमांसा करतानाच, भाजपच्या विजयाच्या कारणांवरही चर्चा व्हायला हवी. काँग्रेसनं मध्य प्रदेशात कमलनाथ यांनी आपल्याभोवती निवडणूक केंद्रीत केली होती. इंडिया आघाडीची होवू घातलेली बैठकही कमलनाथ यांनी होवू दिली नाही. शिवाय माजी मुख्यमंत्री दिग्विजय सिंह यांची काहीशी नाराजी मध्य प्रदेशात प्रचारादरम्यान दिसली. सॉफ्ट हिंदुत्वाचा नारा देण्याचा प्रयत्नही कमलनाथ यांनी दिला होता.

शिवाय राहुल गांधीची भारत जोडो यात्रेचा परिणाम मध्य प्रदेशात दिसेल असा काहीसा सूर राजकीय तज्ज्ञांच्या चर्चेतून दिसत होता. गेल्या निवडणूकीत विजय मिळवूनही अवघ्या वर्षभरात सत्तेपासून दूर बसावं लागल्यानं त्याचं उट्ट काँग्रेस काढेल अशी चर्चा निकालाचे आकडे हाती येईपर्यंत होती.

गेली १५ वर्ष मध्य प्रदेशात भाजपची शिवराजसिंह चौहान यांच्या नेतृत्वात सत्ता आहे, त्यामुळे अँटी इन्कमबन्सी फॅक्टरचे चान्स जास्त होते. राजकारणात सतत तेच नेतृत्व असेल पक्षात मरगळ येते, प्रशासनावर तितका अंकुश राहतोच असं होत नाही, अशी नानाविध कारणं असतात, त्यामुळं यंदाच्या निवडणुकीत चौहान यांचा पत्ता कापला जाईल अशी चर्चा होती.

शिवराजसिंह चौहान जो मध्य प्रदेशमधला भाजपचा चेहरा आहे, त्यांना लोक कंटाळे आहेत, त्यांना जनतेची साथ मिळणार नाही, अशी कुठेतरी चर्चा काँग्रेसकडून करण्यात आली होती. भाजपच्या केंद्रीय नेतृत्वानं अशातच डाव साधला. शिवराज यांना पहिली यादी जाहीर झाली होती, त्यावेळी त्यांचं नाव त्यात नव्हतं, त्यामुळे काँग्रेसच्या चर्चांना आणखी फोडणी मिळाली आणि काँग्रेस तिथेच काहीशी सुस्तावली किंवा जरा निर्धास्त झाली असं म्हणता येईल.

पण निवडणुका असल्यानं शिवराजसिंह यांच्यासारख्या मधाळ बोलणाऱ्या नेत्यानं कोणीही तक्रार न करता, आपलं काम सुरु ठेवलं. दुसरी यादी त्यानंर मध्य प्रदेशमधली जाहीर करण्यात आली, त्यात शिवराज यांचं नाव होतं, त्यामुळे त्यांना दिलासा मिळाला, पण याचसोबत शहा, मोदी, नड्डांनी केंद्रात मंत्री आणि खासदारांना विधानसभेच्या रिंगणात उतरवलं, शिवाय मध्य प्रदेशात मुख्यमंत्री म्हणून चेहरा जाहीर केला नाही, त्यामुळे कुठेतरी प्रचारात आलेली मरगळ भाजपला झटकून देवून कामं करावं लागलं, जर भाजपनं मुख्यमंत्रीपदाचा चेहरा जाहीर केला असता तर कदाचित भाजपला फटका बसू शकला असता, कारण राजकीय महत्त्वाकांक्षा बाळगून असलेल्या नेत्यांच्या आशा मुख्यमंत्रीपदाचा उमेदवार जाहीर होताच मावळल्या असत्या आणि जे काही होईल त्याला तो उमेदवार जबाबदार राहिला असता, शिवाय खासदारांना, केंद्रीय मंत्र्यांनाही यामुळे रिंगणात उतरून २५ लाखांच्या लोकसभेच्या रिंगणात उतरणाऱ्या मंडळींना ५ लाखाच्या मतदारसंघात आपला कस लावून, निवडणूक जिंकून यावं लागलं.

केवळ इतकंच नाही, शिवराज सिंह चौहान यांनी घेतलेली मोदींची भेट असेल, त्यांनी राज्यात राबवलेल्या योजना असतील, शेतीमध्ये मध्य प्रदेशला शिवराज यांनी गेल्या १० वर्षात अग्रेसर करण्यात मोठा वाटा उचलला आहे, लाडली बहना योजना चौहान यांना किंबहुना भाजपला तारक ठरली असली, तरी चौहान यांनी मध्य प्रदेशात विकास केला आहे हेही तितकंच खरं आहे, महिलांचा सन्मान राखणं, त्यांच्यामध्ये आपली प्रतिमा उचावणं आणि मामाजी म्हणून महिलांमध्ये त्यांना मिळालेली लोकप्रियता हे काही चौहान यांच्या विजयाचे 'राज' आहेत मोदी, शहांची स्ट्रॅटेजी मध्य प्रदेशात कामी आली असली तर चौहान यांचाही या विजयात मोलाचा वाटा आहे आणि त्यातही केंद्रीय मंत्री, खासदारांना अनपेक्षितपणे पटावर उतरवून काँग्रेसला चीत केलं, त्यामुळे भाजपच्या सांघिक यशाचे अनेक कंगोरे आहेत, त्यामुळे आगामी काळात काँग्रेसला आपल्या पराभवाचं विश्लेषण करताना, भाजपने विजयात हुरळून न जाणं आगामी लोकसभेसाठी जास्त फायद्याचं ठरू शकतं!

# मोर्शी तालुक्यात अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीच्या पंचनाम्याची चेष्टा !

## शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानाबाबत संबंधित विभाग उदासीन !

**दि.४विदर्भ प्रजासत्ताक मोर्शी –** मोर्शीमोर्शी तालुक्यात अवकाळी पाऊस पडल्यानंतर तातडीने या नुकसान झालेल्या पिकाची पाहणी करून पंचनामे करून शेतकऱ्यांना दिलासा देण्याची मागणी होत असताना कृषी विभाग व महसूल विभाग मात्र वेगळ्याच कामात व्यस्त आहे. पाऊस पडून चार दिवस उलटले, तरी शेतकऱ्यांना अवकाळी पावसामुळे झालेल्या भरपाईच्या पंचनाम्याची प्रतीक्षा आहे. शेतकऱ्यांच्या या उदासीन धोरणाबाबत शेतकरी वर्गातून नाराजीचा सूर उमटत आहे. मोर्शी तालुक्यामध्ये दिनांक २६ नोव्हेंबर ते १ डिसेंबर पर्यंत अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या पिकांच्या पंचनाम्याबाबत महसुल व कृषी विभाग उदासीन असल्याचेचित्र आहे. परंतु प्रशासन पातळीवर 'पंचनाम्याची चेष्टा होत असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका उपाध्यक्ष रुपेश वाळके यांनी केला



अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीची मदत तत्काळ जमा करण्याची मागणी !

आहे.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पाठवलेल्या पत्रात म्हंटलेआहे की, सहा दिवसांचा कालावधी उलटून गेला तरी अजून पंचनामे बाकी आहेत. वास्तविक सरसकट नुकसानभरपाई फॉर्म भरून घेणे आवश्यक असताना तोंड बघून पंचनामे दिशाभूल करणारे ठरणार आहेत. त्यात महसूल व कृषी विभागाच्या पातळीवरील निरुत्साही भावना शेतकऱ्यांच्या अडचणी वाढवणारी ठरते आहे. यांचे कर्मचारी कधी संपावर, कधी रजेवर, कधी दुसऱ्या कामात अडकल्यावर पंचनामा होई पर्यंत लोकांनी शेत मशागत करायचं थांबायचं का? अजून अवकाळी पाऊस पडणारा पडण्याची शक्यता बाकी आहे, ते नव्यानं नुकसान वेगळंच होणार असताना आत्ता शेतकऱ्यांच्या शेतातून ओढ्या सारखं पाणी वाहून गेलं, आज रोजी ते पाणी आटून गेलं, मग वास्तव पाहणीत पाणी नाही, अवकाळी पावसामुळे कपाशीच्या वाता झाल्या असून तूर भाजीला, चना गहू यासह संत्रा मोसंबी उत्पादक शेतकऱ्यांचे कधीही भरून न निघणारे नुकसान झाले असताना ते क्षेत्र टाळणे योग्य आहे का ? हे नुकसान ए सी मध्ये बसून काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना कसं कळणार ? राज्य व जिल्हाधिकारी पातळीवर संबंधित अधिकाऱ्यांना सूचना द्या सरसकट नुकसान भरपाई फॉर्म भरून त्वरित शेतकऱ्यांना नुकसानभरपाई खात्यावर वर्ग करा अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष नरेंद्र जिचकार, महिला राष्ट्रवादी काँग्रेसच्या तालुका अध्यक्ष सौ वृषालिताई वीघे, युवक शहर अध्यक्ष अंकुश घारड, राष्ट्रवादी तालुका उपाध्यक्ष रुपेश वाळके, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक प्रकाश विघे, उमेश गुडधे, वीलास राऊत, रोशन राउत, हितेश उंदरे, पंकज शेळके, यांनी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, कृषी मंत्री धनंजय मुंडे, मदत व पुनर्वसन सचिव यांच्याकडे केली आहे.

# देशातील पहिल्या डिझिटल ग्राम हरिसाल कडे पर्यटकांनी फिरविली पाठ

## ग्रामवासीयांचे आरोग्यही धोक्यात

**दि.४ विदर्भ प्रजासत्ताक धारणी,**देशातील प्रथम डिजिटल ग्राम म्हणून नावजलेले मेळघाटचे हृदयस्थळ असलेल्या हरिसाल गावातून जाणार्या अमरावती-धारणी महामार्गावरून सांडपाणी वाहात असल्याने पर्यटकांना त्रास होत आहे. परिणामी या ठिकाणी असलेल्या निसर्ग संकुलाकडे पर्यटकांनी पाठ फिरवली आहे. ग्रामवासीयांचे आरोग्यही धोक्यात आलेले आहे. नैसर्गिक सौंदर्याने नटलेल्या मेळघाटच्या मधोमध वसलेल्या हरिसाल गावाचे आकर्षण पर्यटकांना खूप आहे. मात्र यावेळी गावासह मुख्य रस्त्यावर सांडपाण्याचा प्रवाह आता सार्वजनिक आरोग्यास धोका ठरत आहे. परतवाडा-धारणी मार्ग हरिसाल गावातून मधोमध निघालेला आहे. व्याघ्र प्रकल्पाच्या नाक्यासमोर प्रचंड घाण पसरलेली असते तर अनेकांचे सांडपाणी रस्त्यावरून वाहते. यामुळे रस्त्यावर खड्डे पडलेले आहे. खड्डु पडल्याने सांडपाण्याचे डबके साचलेले असून डासांचा प्रादुर्भाव होत आहे. या कारणाने पर्यटक आता हरिसाल गावाला न थांबताच सरळ चिखलदरा व धारणीकडे धाव घेत आहेत. नैसर्गिक पर्यटनस्थळ म्हणून हरिसालची ओळख आहे. डिजिटल ग्राम झाल्याने व सिपना नदीकाठी असलेल्या निसर्ग संकुलामुळे




पर्यटक हरिसालला भेट देत असे. आता मात्र मुख्य मार्गावर सर्वत्र सांडपाणी आणि दुर्गंधी पसरलेली असल्याने पर्यटक न थांबता पुढे सरकत आहेत. गावासह मुख्य मार्गावरील सांडपाणी, कचरा आणि खड्ड्यांकडे स्थानिक प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप ग्रामस्थ तथा पर्यटक लावत असले तरी ग्रामपंचायत सतत व हेतुपुरस्सरपणे दुर्लक्ष करीत आहे. रस्त्यावरून वाहणारे सांडपाणी मंदिराकडे पण जात असल्याने ग्रामस्थ संतापलेले दिसत आहेत. डिजिटल ग्राम साकारण्यासाठी केंद्र शासनाने हरिसाल गावावर कोट्यवधीचा खर्च केला. मात्र, स्थानिक प्रशासनाकडून देखभाल, दुरूस्ती आणि ग्रामस्वच्छता न झाल्याने हरिसालमध्ये घाणीचे साम्राज्य पसरलेले आहे.




## वाढत्या वयानुसार तुमची हाडे निरोगी ठेवायची असतील तर....

**दि.४ विदर्भ प्रजासत्ताक**

वय वाढले की गुडघेदुखी, पाठदुखी अशा अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. याचं सर्वात मोठे कारण म्हणजे कालांतराने हाडे कमकुवत होतात. वाढत्या वयानुसार, हाडं झिजतात, ज्यामुळे ते कमकुवत होतात. म्हणून आपण आपली हाडे मजबूत ठेवण्याचा प्रयत्न करणे फार महत्वाचे आहे. वयानुसार हाडे कमकुवत होणे ही नैसर्गिक बाब असली तरी काही मार्गांनी आपण ही समस्या नक्कीच कमी करू शकतो. आपण कोणत्या मार्गांनी आपली हाडे निरोगी आणि मजबूत ठेवू शकता ते जाणून घेऊयात.




**कॅल्शियम–** कॅल्शियम हाडांच्या मजबुतीसाठी खूप महत्वाचे आहे. हे हाडे तयार आणि मजबूत करण्याचे काम करते. त्याच्या कमतरतेमुळे हाडे कमकुवत होऊ लागतात. त्याच्या कमतरतेमुळे, नवीन हाडे तयार होत नाहीत आणि हाडे फ्रॅक्चर होण्याचा धोका देखील लक्षणीय वाढतो. त्यामुळे कॅल्शियमयुक्त पदार्थ जसे की सोया उत्पादने, दूध, चीज, बदाम, तीळ इत्यादींचा आहाराचा भाग बनवा.

**व्हिटॅमिन-D-** व्हिटॅमिन-ऊ आपल्या शरीराला कॅल्शियम शोषण्यास मदत करते. याच्या कमतरतेमुळे शरीर कॅल्शियम वापरू शकत नाही आणि हाडे कमकुवत होऊ लागतात. त्यामुळे आपल्या आहारात व्हिटॅमिन डी समृद्ध अन्नपदार्थ जसे की, मशरूम, अंडी, फॅटी फिश, दूध इत्यादींचा समावेश करा. याशिवाय सूर्यप्रकाश हा व्हिटॅमिन डीचा उत्तम स्रोत आहे. मात्र, जास्त वेळ उन्हात राहू नका.

**नियमित व्यायाम करा–** विशिष्ट प्रकारचे व्यायाम केल्याने हाडे मजबूत होण्यास मदत होते. हाडांची घनता कमी होण्यापासून रोखण्यासाठी स्ट्रेंथ ट्रेनिंग करणे फायदेशीर ठरते आणि नवीन हाडे तयार होण्यासही मदत होते. त्यामुळे वेट ट्रेनर हा तुमच्या व्यायामाचा भाग बनवा. तसेच, लक्षात ठेवा की इतके वजन उचला की त्यामुळे तुमच्या हृदयावर जास्त दबाव पडणार नाही आणि ते नेहमी ट्रेनरच्या देखरेखीखाली करा.

**वजन नियंत्रित ठेवा –** तुमच्या शरीराच्या वजनाचा तुमच्या हाडांवरही परिणाम होतो. जास्त वजनामुळे हाडांवर जास्त ताण येतो, ज्यामुळे ते कमकुवत होऊ शकतात. त्याचप्रमाणे वजन कमी झाल्यामुळे हाडांची घनता कमी होऊन ऑस्टिओपोरोसिस होऊ शकतो. त्यामुळे निरोगी वजन असणे महत्त्वाचे आहे. यासाठी संतुलित आहार आणि व्यायाम करणे अत्यंत आवश्यक आहे.

# दिव्यांगांची आगळीवेगळी राज्यस्तरीय शरीरसौष्ठव स्पर्धा

## जगातील सर्वात लहान बॉडी बिल्डरनं वेधलं लक्ष

**दि.४ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती –** आजपर्यंत आपण सर्वसामान्यांच्या शरीरसौष्ठव स्पर्धा पाहिल्या असतील. परंतु, अमरावतीमध्ये पहिल्यांदाच राज्यस्तरीय दिव्यांगांच्या शरीरसौष्ठव स्पर्धांचं आयोजन करण्यात आलं होतं. अमरावती महानगर पालिका ,प्रहार जनशक्ती पक्षाच्या भारतीय 'प्रहार दिव्यांग कर्मचारी महासंघा'नं या स्पर्धेचं आयोजन केलं होतं. अमरावती शहरातील काँग्रेसनगर रोड स्थित योग्य भवन या ठिकाणी दिव्यांगांची आगळीवेगळी राज्यस्तरीय शरीरसौष्ठव स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते सम्पूर्ण राज्यभरातुन १३ खेळाडू या ठिकाणी आले

या स्पर्धेत संपूर्ण महाराष्ट्रातील दिव्यांग स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. अमरावतीसह वाशिम, नागपूर, धाराशिव, छत्रपती संभाजीनगर, ठाणे, रायगड अकोलासह



संपूर्ण महाराष्ट्रातून स्पर्धक आले होते. तसंच दिव्यांगांसाठी रक्तदान शिविर, नेत्रदान व आरोग्य तपासणी शिबिर सह अन्य कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं.

जगातील सर्वात लहान बॉडीबिल्डर होण्याचा मान रायगडच्या प्रतीक मोहिते यांच्या नावावर आहे. प्रतीकची उंची ३.३ फूट आहे. २८ वर्षीय प्रतीकचं नाव 'गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड'मध्ये नोंदवलं गेलं आहे. प्रतीक हा एक जिम ट्रेनर आहे. त्याच्या नावावर एक नव्हे तर तब्बल दोन जागतिक रेकॉर्ड आहेत.

# ६ ते १४ डिसेंबर विदर्भ, महाराष्ट्र एक्सप्रेस नागपूरपर्यंतच

**दि.४विदर्भ प्रजासत्ताक नागपूर राजनांदगाव**-कन्हान दरम्यान तिसऱ्या रेल्वे मार्गाच्या कामासाठी २ ते १४ डिसेंबरदरम्यान नॉन इंटरलॉकिंगचे काम करण्यात पेणार आहे. पाअंतर्गत गोंदियावरून सुटणाऱ्या विदर्भ व महाराष्ट्र एक्सप्रेसचा प्रवास ६ ते १४ डिसेंबरदरम्यान नागपूरपर्यंतच राहणार आहे.

मुंबई येथील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून सुटणारी मुंबई-गोंदिया विदर्भ एक्सप्रेस ५ ते १३ डिसेंबर दरम्यान गोंदिया ऐवजी नागपूर येथे समाप्त करण्यात येईल. तसेच ६ ते १४ डिसेंबर दरम्यान ही गाडी गोंदिया ऐवजी नागपूर पेधून रवाना होईल. कोल्हापूर येथून निघणार महाराष्ट्र एक्सप्रेस ४ ते १२ डिसेंबर दरम्यान नागपूर पर्यंतच धावेल व ६ ते १४ डिसेंबरपर्यंत गोंदिया ऐवजी नागपुरे पेधून कोल्हापूरला खाना होईल, तसेच गोंदियावरून सुटणाऱ्या डोंगरगड व इतवारी पैसेंजर रद्द राहणार आहे. विशेष म्हणजे, नॉन इंटरलॉकिंगच्या जवळपास कामामुळे ते १४ डिसेंबरदरम्यान या मार्गाने धावणाऱ्या अनेक एक्सप्रेस तसेच पॅसेंजर गाड्या प्रभावित होणार असल्याने प्रवाशांची गैरसोय होणार आहे.

# राज्य उत्पादन शुल्कची जाहिरात रद्द करा

## ट्रायबल फोरमचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांना साकडे

**दि.४विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** –राज्य उत्पादन शुल्क विभागाने राज्यस्तरीय जवान (शिपाई) पदभरतीसाठी ५६८ जागांची जाहिरात काढली आहे. यामध्ये साडेसात टक्के आरक्षण असलेल्या आदिवासी समाजा करिता केवळ ३ पदे आरक्षित ठेवून आदिवासींच्या आरक्षणावर हातोडा मारण्यात आला आहे. त्यामुळे राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या आयुक्तांनी प्रसिद्ध केलेली पदभरतीची जाहिरात रद्द करावी, अशी मागणी राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्याकडे ट्रायबल फोरम, अमरावती जिल्हाध्यक्ष दिनेश टेकाम यांनी केली आहे. संविधानानुसार आदिवासींना शिक्षण, नोकऱ्यां मध्ये साडेसात टक्के आरक्षण आहे. परंतु, महायुती सरकारमध्ये आदिवासींच्या घटनात्मक आरक्षणाला छेद देण्याचे काम सुरू असल्याचे राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या जाहिरातीवरून स्पष्ट दिसत आहे. राज्यात एक ाक ड आरक्षणासाठी आंदोलनाचे वादळ उठलेले असताना दुसरीकडे राज्य सरकारने आदिवासींच्या आरक्षणावर हातोडा मारल्याने बेरोजगार आदिवासी युवकांमधून संताप उमटला आहे.




### आमचा हिस्सा आम्हाला द्या

भारतीय संविधानाने आदिवासी समाजाला साडे सात टक्के आरक्षणाचा वाटा दिला आहे. त्यानुसार आमचा वाटा आम्हाला मिळालाच पाहिजे. राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पदभरतीमध्ये आदिवासी समाजावर अन्याय होत आहे. सरकारने ही जाहिरात रद्द करून चुकवलेली बिंदुनामावली प्रथम दुरुस्त करावी. नंतर नव्याने जाहिरात काढून पदे भरावीत. **– ड. प्रमोद घोडाम**, संस्थापक अध्यक्ष, ट्रायबल फोरम.

# तिन्ही राज्यातील विजय म्हणजे काँग्रेसच्या अहंकाराला मोठी थापड - खा.डॉ.अनिल बोंडे

## भाजप कार्यालयावर ढोल, ताशे, फटाखे फोडत जल्लोष





**दि.४ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** राजस्थान, मध्यप्रदेश,छत्तीसगड मध्ये आज भाजपाला घवघवीत यश मिळाल्यानंतर अमरावतीच्या भाजप कार्यालयात खासदार अनिल बोंडे यांच्यासह कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष केला. हा विजय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा विजय आहे, लोकांनी नरेंद्र मोदी यांच्यावर विश्वास ठेवला त्यामुळे मोदी है तो मुमकिन आहे अशा प्रकारच्या घोषणा यावेळी देण्यात आल्या, या निवडणुकीमध्ये सर्वात जास्त विश्वास,शेतकरी शेतमजूर, मातृ शक्तीने नरेंद्र मोदी यांच्यावर ठेवला आहे. त्यामुळे तिन्ही राज्यात नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनामध्ये हे सरकार आलं आहे, त्यामुळे ही काँग्रेसच्या अहंकाराला मोठी थापड आहे अशी प्रतिक्रिया खासदार अनिल बोंडे यांनी यावेळी दिली अनेकदा काँग्रेसने नरेंद्र मोदी यांना शिव्या दिल्या त्या त्या वेळेला नरेंद्र मोदी यांना जनतेने पाठिंबा दिला, ज्यावेळी मोदी यांना मौत का सौदागर म्हटलं तेव्हा गुजरात मधून काँग्रेस नष्ट झाली, ज्यावेळी राहुल गांधी यांनी चौकीदार चौर म्हटलं तेव्हा लोकसभेतून काँग्रेस नष्ट झाली, आणि आता मोदींना पनवती म्हटलं तर तिन्ही राज्यात काँग्रेसची हार झाली. त्यामुळे नरेंद्र मोदी हे पनवती नाहीतर राहुल गांधी हे पनवती आहे अशी टीका यावेळी अनिल बोंडे यांनी केली त्यामुळे २०१७ ला विकसित भारत करण्यासाठी नरेंद्र मोदींना हा कौल आहे आणि २०२४ मध्ये तिसऱ्यांदा नरेंद्र मोदी हेच पंतप्रधान बनतील असेही यावेळी खा.अनिल बोंडे यांनी सांगितलं. यावेळी मोठ्या प्रमाणात अमरावतीच्या भाजप कार्यालयात कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष केला होता.

## स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, न्याय पहिल्यांदा धोक्यात : श्याम मानव

**दि.४विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** :देशाला संविधाना तूनच स्वातंत्र्य, समता, बंधुत्व आणि न्याय ही मूल्ये मिळाली आहेत. या चार मूल्यांवरच देशातील लोकशाही टिकून आहे. परंतु स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच ही चारही मूल्ये पायदळी तुडविण्याचे काम सुरू आहे. त्यामुळे २०२४ मध्ये लोकशाही वाचविण्यासाठी प्रत्येकाने एकत्र येण्याची गरज असल्याचे मत अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक प्रा. श्याम मानव यांनी रविवारी जाहीर व्याख्यानामध्ये व्यक्त केले.निर्भय बनो विचार मंचच्या वतीने संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथे भारतीय लोकशाहीसमोरील आव्हाने' यावरील व्याख्यानात मुख्य मार्गदर्शक म्हणून श्याम मानव उपस्थित होते.देशाच्या उन्नतीचे एकमेव माध्यम हेभारतीय संविधान आहे. मात्र, संविधानातील समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय या चारही मूल्यांचा हास होत आहे. देशात असे हे पहिल्यांदाच घडत आहे. इंदिरा गांधी यांच्या आणीबाणी काळात फक्त अभिव्यक्ती स्वातंत्र्य धोक्यात होते. त्यावेळी देशातील बंधुत्व, स्वातंत्र्य अबाधित होते. देशात वैज्ञानिक दृष्टिकोन, मूल्ये जपली जात नाहीत.अंधश्रद्धेला खतपाणी घालण्याचे काम सुरू असल्याचा आरोप प्रा. श्याम मानव यांनी केला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार अविनाश दुधे हे होते. प्रास्ताविकातून आमदार यशोमती ठाकूर यांनी समाजात पुरोगामी विचारसरणी रुजविण्यासाठी शेवटच्या श्वासापर्यंत कार्यरत राहू, अशी ग्वाही दिली. यावेळी माजी मंत्री डॉ. सुनील देशमुख, माजी महापौर विलास इंगोले, अंजली देशमुख, बबलू शेखावत आदी उपस्थित होते.



## 'डीपफेक'साठी डीपी-प्रोफाईल छायाचित्रांचा वापर, राज्य सायबर क्राईम विभागाकडून सतर्कतेचा इशारा

**दि.४ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** : डीपफेक गुन्हेगारीचा राज्यभरात धोका निर्माण झाला आहे. फेसबुक, इन्स्टाग्राम, व्हॉट्सअॅपच्या डीपी किंवा प्रोफाईलवरील छायाचित्र वापरून डीपफेक केले जात आहे. महाराष्ट्र सायबर क्राईम विभागाने याबाबत सतर्कतेचा इशारा दिला आहे.गेल्या काही महिन्यांपासून महाराष्ट्र, दिल्ली, गुजरात, पश्चिम बंगाल, पंजाब कर्नाटक, केरळ आणि चेन्नईसह अन्य राज्यातही डीपफेकच्या तक्रारी दाखल होत आहेत. यामध्ये मोठमोठ्या अभिनेत्रींसह राजकीय व्यक्तींचा समावेश आहे. बदल्याच्या भावनेतून किंवा सूड उगविण्यासाठी डीपफेकचे प्रकार घडत आहेत. त्यामुळे महाराष्ट्र सायबर विभागाने याबाबत जनजागृती करणे सुरू केले आहे.

### खाते 'लॉक' करा

नागरिकांनी आपले फेसबुक, इन्स्टाग्राम खाते 'लॉक' करावे. समाजमाध्यमांवर छायाचित्र टाकताना तेदेखील 'लॉक' करावे किंवा त्या बाबतीत गुप्तता बाळगावी. अज्ञात व्यक्तींची फ्रेंड रिक्वेस्ट स्वीकारू नये, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

डीपफेक चित्रफितींमध्ये मशीन लर्निंग आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर केला जातो. समाजात बदनामी करणे एवढाच उद्देश डीपफेकमागे असतो. याप्रकरणी पुणे, मुंबई आणि नागपुरात अनेकांना ताब्यात घेण्यात आले आहे.

## पिंपरीचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना विशेष बाब म्हणून मदत द्या- खासदार डॉ.अनिल बोंडे

### जिल्हाधिकाऱ्यांना केल्या सूचना



**दि.४ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** - अंजनगाव सुर्जी : तालुक्यात कापूस, तूर, कांदा यासह औषधी वनस्पती असलेल्या पिंपरी पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. पिंपरी या औषधी वनस्पतीचे ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे, त्यांना विशेष बाब म्हणून अनुदान मंजूर करावे. अशा सूचना राज्यसभेचे खासदार तथा भाजपचे जिल्हाध्यक्ष डॉ.अनिल बोंडे यांनी जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांना केल्या. खासदार खासदार डॉ.अनिल बोंडे यांनी शनिवारी (ता.२) अंजनगाव सुर्जी तालुक्यातील नुकसानग्रस्त शेती पिकाची पाहणी केली. त्यांनी प्रत्यक्षात शेतीच्या बांधावर जाऊन कापूस, तूर, कांदा, औषधी वनस्पती असलेल्या पानपिंपरी यासह अन्य पिकांची पाहणी केली. अंजनगाव सुर्जी तालुक्यात मोठ्या प्रमाणात शेती पिकांचे नुकसान झाल्याचे त्यांना पाहायला मिळाले. शेतकरी हवालदिल झाल्याने शेतकऱ्यांनी तशी आपबीती त्यांच्यासमोर कथन केली. शेतकऱ्यांच्या मागणीची तातडीने दाखल घेत डॉ. अनिल बोंडे यांनी जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्या सोबत भ्रमणध्वनीवरून संवाद साधला. महसूल, कृषी तसेच डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या चमुने समन्वयाने काम करून शेती पिकांचे सर्वेक्षण करावे. शेतकऱ्यांना तातडीने मदत द्यावी. तसेच नुकसानग्रस्त शेतीची पाहणी करण्याच्या सूचना त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना केल्या. यावेळी माजी आमदार रमेश बुंदिले, सरचिटणीस डॉ. विलास कविटकर, भाजपा तालुकाध्यक्ष रवी गोळे, शहराध्यक्ष उमेश भोंडे, कमलकांत लाडोळे, श्रीराम नेहर, नकुल सोनटक्के, संजय वाघमारे, तहसीलदार पुष्पा सोळंके, गटविकास अधिकारी विनोद खेडकर यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.

## डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय रूग्णालयाला किडणी प्रत्यारोपनाची मान्यता



**दि.४ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** श्री शिवाजी शिक्षण संस्था व्दारा संचालित डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय संलग्न रूग्णालयाला महाराष्ट्र शासनाकडून नुकतिच किडनी प्रत्यारोपन शस्त्रक्रिया करण्याची परवानगी प्राप्त झालेती आहे. संस्थेने गेल्या मार्च महिन्यात या संबंधिचा प्रस्ताव महाराष्ट्र शासनाला सादर केलेला होता. प्रस्तावाची छाननी करून शासन स्तरावर जिल्हा शल्य चिकित्सक, अमरावती यांच्या निरिक्षण समितीने संस्थेच्या प्रस्तावाची प्रत्यक्ष पाहणी करून त्याकरीता लागणारे तज्ञ मणुष्य बळ, शस्त्रक्रिया गृह, आय.सी.यू. व इतर उपलब्ध साधन सामुग्री याचा संपूर्ण आढावा घेऊन असलेल्या त्रुटींची पूर्तता संस्थेच्या माध्यमातून पूर्ण करून निरीक्षण समितीने गेल्या ऑक्टोंबर २०२३ मध्ये शासनाला अहवाल सादर केला होता व त्याचीच फलश्रुती म्हणून डॉ. पंजाबराव देशमुख रुग्णालयाला किडनी प्रत्यारोपनाची मान्यता शासनाकडून पुढील पाच वर्षा करीता प्राप्त झालेली आहे.

श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. हर्षवर्धनजी प्र. देशमुख, महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. अनिल टी. देशमुख, वैद्यकीय अधिक्षक डॉ. गणेश एम. काळे, डॉ. पवन आर. टेकाडे, डॉ. सोमेश्वर आर. निर्मळ यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यवाही करण्यात आली. ब्रेन स्टेम डेथ समिती मध्ये डॉ. गणेश पुंडकर, डॉ. सुनिल लव्हाळे, डॉ. नारायण उमाळे, न्यूरोलॉजीस्ट डॉ. आनंद काकानी यांचा समावेश करून मान्यता दिलेली असून किडणी प्रत्यारोपन चमू मध्ये यूरोसर्जन डॉ. विक्रम देशमुख, डॉ. विशाल बाहेकर, डॉ. राहुल घुले, नेफ्रोलॉजीस्ट डॉ. स्वप्नील मोलके, डॉ. निखिल बडनेरकर, भुलतज्ञ म्हणून डॉ. शशिकुमार चौधरी, डॉ. विजया बोरकर तसेच ट्रांन्सप्लांट कोऑर्डीनेटर म्हणून सतिश वडनेरकर यांचा समावेश आहे.येत्या काही दिवसात अजून नेफ्रोलॉजीस्ट, यूरोलॉजीस्ट व बधिरीकरण तज्ञांचा चमू मध्ये समावेश करणे संबंधी शासनाला मान्यतेकरीता महाविद्यालय स्तरावरून कार्यवाही करण्यात येणार आहे.

## पोहरा मार्गावर हेल्यांची बेकायदेशीर टक्कर

**दि.४विदर्भ प्रजासत्ताकपोहराअमरावती** :पोहरा मार्गावर बेकायदेशीररीत्या हेल्यांची टक्कर स्पर्धा आयोजित करून त्यावर शर्यत लावण्याचा प्रयत्न फ्रेजरपुरा पोलिसांनी उधळून लावला. पोलिसांनी धाड टाकून नऊ मालवाहू वाहनांसह ९ जनावरे जप्त केली.

ही कारवाई ३ डिसेंबर रोजी दुपारी करण्यात आली. याप्रकरणी हेला मालकांसह आयोजकांविरुद्धही गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पौहरा मार्गावर हेला प्रदर्शनाच्या नावावर रविवारी दुपारी टक्कर स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत हेल्यांच्या टकरीवर शर्यतसुद्धालावण्यात येत होती. याबाबत फ्रेजरपुरा पोलिसांना माहिती मिळाली. या माहितीच्या आधारावर पोलिसांनी त्या ठिकाणी धाड टाकली.

या कारवाईत पोलिसांनी नऊ मालवाहू वाहनांसह नऊ जनावरे जप्त केलीत, याप्रकरणी हेला एकांसह आयोजकांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला ही कारवाई फ्रेजरपुराचे ठाणेदार गोरखनाथ जाधव, सहायक पोलिस निरीक्षक वीरेंद्र केदारे, रवींद्र सहारे, योगेश श्रीवास, हरिश बुंदेले, हरिश चौधरी, जय परिवाले, शशिकांत गवई, सतीश कोराडे, सचिन मेश्राम, अमोल राठोड, मुसाहीद खान यांनी केली.

## न्यू हायस्कूल मेन येथे शताब्दी समारोह निमित्त माजी विद्यार्थी सभा




**दि.४विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** - न्यू हायस्कूल मेन येथे शताब्दी समारोह निमित्त कार्यक्रमाची रूपरेषा ठरविण्यासाठी माजी विद्यार्थ्यांची सभा संपन्न झाली. जानेवारी २०२४ पासून न्यू हायस्कूल मेन ह्या शाळेच्या स्थापनेला शंभर वर्ष पूर्ण होत आहेत. अमरावती शहराच्या इतिहासात सुवर्णाक्षरात लिहून ठेवण्यासारखा हा प्रसंग. स्वातंत्र्यपूर्व त्याचप्रमाणे स्वातंत्र्योत्तर कालखंडातला एक दैदिप्यमान इतिहास असणारी ही शाळा आता शंभर वर्ष पूर्ण करीत आहे .स्वातंत्र्यपूर्व काळात, राष्ट्रीय शिक्षण देण्याच्या उदात्त हेतूने दादासाहेब खापर्डे यांनी स्थापन केलेली ही शाळा आजही देशकार्यात यशस्वीपणे हातभार लावणारी, अनेक नररत्ने निर्माण करीत आहे. सर्व माजी विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी ,त्याचप्रमाणे विविध उपक्रम राबविण्याच्या निमित्ताने, समिती गठन करण्यासाठी व माजी विद्यार्थ्यांचे मनोगत जाणून घेण्यासाठी या बैठकीचे आयोजन केले होते. यामध्ये अमरावती येथील अनेक गणमान्य माजी विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला. स्वातंत्र्यसंग्रामात सक्रिय सहभाग असलेल्या ,अनेक थोर स्वातंत्र्यसैनिकांनी या शाळेच्या उभारणीपासून सतत सहकार्य केले आहे .स्वातंत्र्यसमरातील अमरावतीचे योगदान फार महत्त्वपूर्ण होते .त्यामध्ये न्यू हायस्कूल मेन शाळेने भरीव योगदान दिले होते. या अभिमानास्पद वास्तविकतेचे भान सर्व माजी विद्यार्थ्यांना आहे. व ह्या दैदिप्यमान कालखंडात आपले योगदान देणाऱ्या सर्व माजी शिक्षक ,त्याचप्रमाणे सर्व विद्यार्थ्यांना ह्या उपक्रमामध्ये सहभागी होण्यासाठी आमंत्रित केले जात आहे. आणि त्यामुळे शाळेचा शताब्दी पूर्ती समारोह अत्यंत दिमाखदारपणे संपन्न व्हावा यासाठी आम्ही सगळे कटिबद्ध आहोत ह्या गोष्टीची प्रत्येक माजी विद्यार्थ्यांच्या मनोगता मधून पुनरुच्चार होत होता. कार्यक्रमाची सुरुवात शाळेची प्रार्थना सुसंगती सदा घडो सुजन वाक्य कानी पडो या प्रार्थनेनी झाली यावेळी शाळेतील सुमधुर दिवसाच्या आठवणीने उपस्थित आमचे मन भरून आले कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.जदबंसी यांनी केले. या वर्तमानपत्राच्या माध्यमातून आम्ही न्यू हायस्कूल मेन शाळेच्या सर्व. माजी विद्यार्थ्यांना जाहीर आवाहन करीत आहोत की त्यांनी खालील दिलेल्या क्रमांकावर आपापली माहिती शाळेच्या ग्रुप वर भरून द्यावी व शताब्दी समारोहा मध्ये प्रत्यक्ष उपस्थित राहुन आपला सक्रिय सहभाग नोंदवावा.

## बीबीएनजी तर्फे आंतरराष्ट्रीय परिषद नाशिक येथे ४ फेब्रुवारी रोजी

### जगभरातील नामवंत ब्राह्मण उद्योजक येणार




**दि.४ विदर्भ प्रजासत्ताक नाशिक–** ब्राह्मण व्यवसायिकांची देशातील सर्वात मोठी संस्था ब्राह्मण बिझनेस नेटवर्क ग्लोबल ( बीबीएनजी ) तर्फे ८ वी आंतरराष्ट्रीय परिषद परिवर्तन ४ फेब्रुवारी २०२४ रोजी नाशिक येथील गुरुदक्षिणा हॉल येथे होणार असून या परिषदेसाठी जगभरातील नामवंत ब्राह्मण उद्योजक येणार असल्याची माहिती बीबीएनजी चे संस्थापक अध्यक्ष श्रीपाद कुलकर्णी यांनी दिली .

उद्योजकाचे देशाच्या विकासात मोलाचे योगदान असून देशाचे अर्थकारण व रोजगार निर्मिती मध्ये देखील उद्योजकांची महत्वाची भूमिका असते . या परिषदेचा उद्देश व्यवसायाच्या वाढीसाठी विचारमंथन , गुंतवणूकदारांच्या बैठका, खास आयोजित केलेल्या इ२इ मीटिंग्ज, बिझनेस इंटरएक्टिव्ह सेशन्स, नामवंत व्यावसायिकांचे मार्गदर्शन आणि विविध उद्योजकांशी थेट संवाद असा असल्याचे देखील त्यांनी नमूद केले..

गेली ८ वर्षापासून ही परिषद देशातील प्रमुख शहरात आयोजित करण्यात येते. नाशिक पासून सुरू झालेल्या या परिषदेचे आयोजन या वर्षी नाशिक ला मिळाला आहे.या वर्षी या परिषदेसाठी डॉ. अशोक जोशी (अमेरिका), डॉ. विजय जोशी (सिडनी, ऑस्ट्रेलिया), डॉ. संजय पैठणकर (यूएई), आनंद गानू (गर्जे मराठी यूएसए), रवींद्र साठचे (अध्यक्ष, खादी आणि ग्रामोद्योग ), सुनील देवधर, उद्योजिका अलिका किर्लोस्कर, उदय निरगुडकर, गिरीश चितळे , रवींद्र प्रभुदेसाई , असे जगभरातील आपापल्या क्षेत्रातील मान्यवर व्यक्ती उपस्थित राहणार आहेत. विशेष म्हणजे या कार्यक्रमाचे निमंत्रण केंद्रीय मंत्री नितीन गडकरी व लोकसभेच्या माजी सभापती सुमित्रा महाजन यांनी देखील स्वीकारले आहे.

या एकदिवसीय परिषदेत, उद्यम कौशल (ब्राह्मण शार्क टँक), उद्यम कौस्तुभ अवॉर्ड शो आणि विविध उद्योजकांना भेटण्याच्या आणि नेटवर्कच्या संधींद्वारे नवनवीन उत्पादनांचे लाँचिंग, उद्योजकीय कौशल्यांचे प्रदर्शन होणार आहे.अधिक माहिती साठी ९८२२७५३२२६ येथे संपर्क साधावा असे आवाहन परिवर्तन परिषदेचे प्रमुख डॉ.अभिजीत चांदे यांनी केले आहे.

परिषद यशस्वी होण्यासाठी मुकुंद कुलकर्णी, मधुरा कुंभेजकर, अरविंद कोराळकर , महेश देशपांडे, नितीन बेळे, डॉ.संदीप चिंचोलिकर, अक्षय जळगांवकर, रसिका कुलकर्णी, महेंद्र एकबोटे, जगदीश कुलकर्णी, पूनम शुक्ल, अमोल अबोटी, वैशाली सायंदे,श्रेयस कुलकर्णी, गौरव खिस्ते, हिमांशू कुलकर्णी तसेच सर्व सदस्य परिश्रम घेत आहेत.

# मध्य प्रदेशात भाजपला मिळाली 'लाडली' बहिणींची साथ

## वाचा भाजपाच्या विजयाची १० मोठी कारणे

**दि.४विदर्भ प्रजासत्ताक**
**छिंदवाडा** – मध्य प्रदेशात भाजपने बंपर विजय मिळवला आहे. आतापर्यंतच्या निकालानुसार विधानसभेच्या एकूण २३० जागांपैकी भाजपला १६५ तर काँग्रेसला ६४ जागा मिळताना दिसत आहे. दोन दिवसांपूर्वीपर्यंत राज्यात काँग्रेस आणि भाजप यांच्यात निकराची लढत असल्याचा दावा एक्झिट पोलमधून केला जात होता.

मात्र भाजपचे नेते सुरुवातीपासूनच येथे बंपर विजय मिळणार असल्याचा दावा करत होते. भाजप नेत्यांच्या मते, सत्ता आणि संघटनेचा उत्तम समन्वय हे या विजयी निकालाचे प्रमुख कारण आहे. मुख्यमंत्री शिवराज सिंह चौहान यांची महिलांसाठीची लाडली योजना असो किंवा शेतकऱ्यांसाठी व्याजमाफी योजना असो, भाजपला त्यांचा फायदा झाला आहे. यातच भाजपच्या विजयाची प्रमुख कारणे आपण जाणून घेणार आहोत.

### भाजपच्या विजयाची प्रमुख कारणे

- पक्षाची निवडणूकपूर्व तयारी, निवडणूक प्रचारादरम्यानची कामे. अनेक पातळ्यांवर नियोजनाचे काम झाले.
- प्रदेशाध्यक्ष व्हीडी शर्मा, राष्ट्रीय सह-संघटना सरचिटणीस शिवप्रकाश यांच्यासह पक्षाच्या नेत्यांनी कार्यकर्त्यांची भेट घेतली आणि परिस्थितीचा सखोल अभ्यास केला.
- प्रचारक मंडळाने प्रत्येक लहान विषयाचे सकारात्मक नियोजन करून कार्य केलं.
- नरेंद्र सिंह तोमर यांसारख्या बड्या नेत्यांचे निवडणूक लढवणे, गृहमंत्री अमित शाह यांची संघटनात्मक बैठक, निवडणूक प्रभारी भूपेंद्र यादव




आणि अश्विनी वैष्णव यांची कार्यशैली महत्त्वाची ठरली.
- केंद्र व राज्य शासनाची उत्कृष्ट कामे लोकांपर्यंत पोहोचवली.
- बूथ विस्तार अभियानाचा उपयोग फायदेशीर ठरला. यामध्ये प्रत्येक बुथवर १५ ते २० कार्यकर्त्यांची नियुक्ती करण्यात आली होती.
- पक्षाने बूथ अध्यक्ष, बूथ सचिव आणि इङ्ज तयार करून सर्वात लहान युनिट मजबूत केल्याचा फायदा झाला.
- २०१८ च्या विधानसभा निवडणुकीत जिथे भाजपचा पराभव झाला होता, तिथे विशेष प्रभारी निवडून विजय निश्चित केला.
- फेब्रुवारी महिन्यातील रविदास महाकुंभ आणि २७ जून रोजी डिजिटल रॅलीसह मोठे कार्यक्रम फायदेशीर ठरले. राज्यभरातून काढण्यात आलेल्या समरस्त यात्रेत संघटनेने महत्त्वाची भूमिका बजावली, ज्यामुळे अनुसूचित जाती प्रवर्गात भारतीय जनता पक्षावर अधिक विश्वास निर्माण झाला.
- निवडणूक जाहीरनामा बनवण्यापूर्वी, भाजपने जाहीरनामा समितीला भेट देण्याचे ठरवले, त्यानंतर लोकांना जे हवं आहे, तेच त्यात मांडण्यात आलं. ज्याचा फायदा मतांच्या रुपयाने झाल्याचं पाहायला मिळत आहे.

## नेमकी पनौती कोण, हे काँग्रेसला आज कळले असेल; फडणवीसांचा काँग्रेसला चिमटा

**दि.४ विदर्भ प्रजासत्ताक**
**अमरावती** – पाच राज्यांच्या विधानसभा निवडणूकांदरम्यान काँग्रेसने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर 'पनौती' अशी टिप्पणी करत सोशल माध्यमांवर मोहीमच चालवली होती. मात्र निकालानंतर भाजप नेत्यांनी या ट्रेंडवरून काँग्रेसला प्रत्युत्तर दिले आहे. चारपैकी तीन राज्यात भाजपाला मिळालेले अभूतपूर्व यश हा पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या पारदर्शी प्रामाणिकतेचा विजय आहे. या निकालाने नेमकी पनौती कोण, हे काँग्रेसला आता कळून चुकले असेल,



असा टोला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लगावला.

चार राज्यातील निवडणूक निकालांवर नागपूर येथे ते रविवारी प्रसारमाध्यमांशी बोलत होते. ज्या पारदर्शी प्रामाणिकतेने पंतप्रधानांनी गरीब कल्याणाचा अजेंडा राबविला, सरकार खऱ्या अर्थाने जनतेसाठी काम करते आहे, हा विश्वास त्यांनी जनतेच्या मनात निर्माण केला. या निकालाने जनतेने इंडी आघाडी आणि राहुल गांधी यांचा अजेंडा नाकारला हेही स्पष्ट झाले. नेमकी पनौती कोण हेही आता काँग्रेस पक्षाला कळाले असेल आणि त्यामुळे भविष्यात ते असे शब्द आता वापरणार नाहीत, असे ते म्हणाले.

### आता ईव्हीएमवर फोडतील खापर

आता इंडी आघाडीची लवकरच बैठक होईल व ते ईव्हीएमवर खापर फोडतील. जोपर्यंत या मानसिकतेतून काँग्रेस बाहेर पडत नाही, तोवर त्यांचे काहीच होऊ शकत नाही. आगामी लोकसभा निवडणुकीत तेलंगणात भाजपाचेच सर्वाधिक खासदार निवडून येतील. महाराष्ट्रात सुद्धा लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत दणदणीत यश आम्ही मिळवू, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## राहुल गांधींनी पराभव स्वीकारला; म्हणाले-'विचारधारेची लढाई सुरुच राहणार...'

**दि.४विदर्भ प्रजासत्ताक**
**नवी दिल्ली** – मध्य प्रदेश, छत्तीसगड, राजस्थान आणि तेलंगणा विधानसभा निवडणुकीचे निकाल हाती आले. मध्यप्रदेश, छत्तीसगड आणि राजस्थानमध्ये भाजपने मोठा विजय मिळवला, तर तेलंगणात पहिल्यांदाच काँग्रेसची सत्ता आली. आजच्या निकालांवर काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्यानंतर राहुल गांधी यांची पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे.

भाजपने मध्य प्रदेशात



आपली सत्ता राखली तर छत्तीसगड आणि राजस्थानमध्ये मोठा विजय मिळवला. या दोन राज्यांमध्ये काँग्रेसला दारुण पराभवाचा सामना करावा लागला. या निकालानंतर राहुल गांधी यांनी सर्वांचे आभार मानले. मध्य प्रदेश, छत्तीसगड आणि राजस्थानचा जनादेश आम्ही नम्रपणे स्वीकारतो. विचारधारेची लढाई सुरुच राहणार.

### मल्लिकार्जुन खर्गे काय म्हणाले?

पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे म्हणाले की, काँग्रेसवर विश्वास दाखवल्याबद्दल मी तेलंगणातील मतदारांचे आभार मानतो. ज्यांनी आम्हाला छत्तीसगड, मध्य प्रदेश आणि राजस्थानमध्ये मतदान केले, त्या सर्वांचेही आभार मानतो. हे निवडणूक निकाल आमच्या अपेक्षेप्रमाणे आले नाहीत, पण आम्हाला खात्री आहे की, आम्ही कठोर परिश्रम आणि दृढनिश्चयाने परत येऊ. मी आमच्या असंख्य कार्यकर्त्यांचेही आभार मानतो. या पराभवाने खचून न जाता 'इंडिया' आघाडीतील पक्षांसोबत आगामी लोकसभा निवडणुकीची तयारी सुरू करू, अशी प्रतिक्रिया खर्गेंनी दिली.

# नरेंद्र मोदीजींचा करिष्मा भाजपाला स्पष्ट बहुमत – आमदार प्रविण पोटे पाटील

## विधानसभा निवडणूकांमध्ये भाजपची सरशी, सर्वत्र उत्साह

**दि.४ विदर्भ प्रजासत्ताक**
**अमरावती–** संपूर्ण देशाचे लक्ष लागून असलेल्या विविध राज्यांच्या विधानसभा निवडणूकांमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भारतीय जनता पक्षाने तीन मोठ्या राज्यांमध्ये एकहाती सत्ता संपादन करून मोठा विजय प्राप्त केला आहे. या विजयामुळे संपूर्ण देशात जल्लोष साजरा होत असतानाच अमरावती येथे आमदार प्रवीण पोटे यांच्या कार्यालयासमोर भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी फटाक्यांच्या आतषबाजीसह जल्लोष साजरा केला आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांचा करिष्मा पुन्हा या निवडणुकीत घवघवीत यश संपादन करत बघायला मिळाला असून देशात अहंकार आणि घराणेशाहीच्या विरोधात सर्वसामान्य आणि लोकशाहीला मानणाऱ्या नागरिकांनी आपल्या मतांची ताकद पुन्हा एकदा दाखवून दिली आहे. देशातील तीन मोठ्या राज्यात सत्ता मिळवत असतानाच भाजपने पुढील लोकसभा निवडणुकीसाठी पुन्हा एकदा पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्यावरिल जनतेचा असलेला विश्वास मजबूत असल्याचे दाखवून दिले आहे. सर्वसामान्य कार्यकर्त्यांचा पक्ष असलेल्या भारतीय जनता पार्टीवरील जनतेचा विश्वास अधिक दृढ होत असून येणाऱ्या काळात महाराष्ट्रात देखील एकहाती सत्ता भाजपच्या हाती येईल असा आम्हाला विश्वास आहे. जनतेसाठी केलेल्या कामाचा आणि प्रबळ विचारशक्तीचा विजयोत्सव संपूर्ण देशात साजरा होणार आहे असे मत भाजपा शहर अध्यक्ष आमदार प्रविण पोटे पाटील यांनी व्यक्त केले आज हाती आलेल्या विधानसभा निवडणूकांच्या



निकालानुसार राजस्थान, मध्यप्रदेश आणि छत्तीसगड या तीन राज्यांमध्ये सर्वात मोठा पक्ष म्हणून भारतीय जनता पक्षाने एकहाती सत्ता प्राप्त केली आहे. राजस्थान आणि छत्तीसगडमधून काँग्रेसला हद्दपार करित मध्यप्रदेशात पुन्हा एकदा भाजपकडेच बहुमत मिळविण्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भारतीय जनता पक्षाच्या सर्व पदाधिकाऱ्यांना व नेत्यांना यश आले आहे. हा विजय जनशक्तीचा विजय असून देशात मोदींची लाट आजही कायम असल्याचे हे द्योतक असल्याचा सुर अमरावती शहरातील भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकाऱ्यांमध्ये दिसून आला. आज शहराध्यक्ष प्रवीण पोटे यांच्या नेतृत्वात भाजपच्या सर्व पदाधिकारी तसेच कार्यकर्त्यांनी इर्विन चौक येथील



आमदार प्रवीण पोटे यांच्या जनसंपर्क कार्यालयासमोर एकत्र येऊन एकच जल्लोष साजरा केला. यावेळी फटाक्यांच्या आतषबाजीसह सर्व कार्यकर्त्यांनी विजयाचा आनंद साजरा करत भाजपचा जयजयकार देखील केला. यावेळी भाजपचे नेते जयंत डेहनकर, चेतन पवार, सतिश करेसीया, कौशिक अग्रवाल, सूनील काळे, ऋषिकेश देशमुख, सूनील राहू, राजू कुरील, शाम साबळे, अन्ना डाके, मिलिंद बांबल, सारंग राऊत, अखिलेश राठी, यश पटवा, प्रवीण रूद्रकार, हरिष साऊरकर, गंगाताई खारकर, लखन राज, शीतल वाघमारे, गुहे, भाग्यश्री देशमुख, राधा कुरील, आदींसह सर्व प्रकोष्ठ तथा विविध सेलचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## दर्यापूर मध्ये भाजप चा जल्लोष

**दि.४विदर्भ प्रजासत्ताक**
**दर्यापूर** येथील भारतीय जनता पार्टी कार्यालय मूर्तिजापूर रोड येथे दर्यापूर अंजनगाव सुर्जी विधानसभा अध्यक्षगोपाल भाऊ चंदन, माजी आमदाररमेश बुंदेले जिल्हा उपाध्यक्षबाबाराव पाटील बरवट यांच्या मार्गदर्शन मध्ये भारतीय जनता पार्टी तालुका अध्यक्षमदन पाटील बायस्कार व शहर अध्यक्षरवींद्रजी ढोकणे यांच्या नेतृत्व मध्ये आज भारतीय जनता पार्टीने तीन राज्यांमध्ये जे



घवघवीत एकहाती सत्ता मिळवली त्याबद्दल एकमेकांना पेढे भरवून फटाका्यांची अतिशबाजी करून जल्लोष साजरा करण्यात आला.या जल्लोषा वेळी बाबाराव पाटील बरवट,गोपाल भाऊ चंदन,रमेश भाऊ बुंदिले,मदन पाटील बास्कर, रवींद्र ढोकणे, माणिकराव मानकर, अनिल कुंडलवाल, प्रफुल् लोडम,ऍड भूषण खंडारे शिवचरण सरकटे ,गणेशराव पावडे,अशोकराव सांगोले,स्वप्निल गावंडे,अनिल पतींगे,विलास धांडे, विनोद उमाळे,मारुतीराव मस्के,अरुणराव ढोकणे सोशल मीडिया तथा प्रसिद्धी प्रमुख तृषाल प्रभाकरराव कडू व समस्त भारतीय जनता पार्टी चे पदाधिकारी उपस्थित होते.

## अमरावती विभागीय आयुक्तांकडून बाभुळगाव तालुक्यातील मतदान केंद्रांची पाहणी

**दि.४ विदर्भ प्रजासत्ताक**
**बाभुळगाव,** – निवडणुकीचे वारे वाहू लागले आहे. अशातच बाभुळगाव तालुक्यातील मालापूर व करळगाव या दोन गावांच्या मतदान केंद्रांची पाहणी अमरावती विभागीय आयुक्त डॉ. निधी पांडे यांनी केली. डॉ. निधी पांडे यांचे शुक'वारी दुपारी बाभुळगाव तालुक्यातील मालापूर गावी आगमन झाले. या वेळी त्यांचे स्वागत करण्यात



आले.

मालापूरच्या मतदान केंद्राची पाहणी केल्यानंतर यांनी करळगावच्या मतदान केंद्राची पाहणी केली. यावेळी त्यांचे तहसीलदार मीरा पागोरे व गटविकास अधिकारी रविकांत पवार आणि विद्यार्थ्यांनीसुद्धा स्वागत केले. मतदान केंद्र पाहणी दरम्यानडॉ. निधी पांडे यांच्यासह उपायुक्त गजेंद्र बावणे, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, तहसीलदार मीरा पागोरे, गटविकास अधिकारी रविकांत पवार, निवडणूक नायब तहसीलदार कांबळे, बीएलओ, संबंधित तलाठी व कोतवाल हजर होते.

# महाकालच्या दरबारातून कलश रथ मार्गस्थ

## कलशात अयोध्येतली पवित्र माती

**दि.४ विदर्भ प्रजासत्ताक**
**अमरावती –**उज्जैन येथील प्रभू महाकालच्या दरबारात शनिवार २ डिसेंबर रोजी सकाळी ९ वाजता अयोध्येतील प्रभू श्रीराम जन्मभूमी आणि हनुमान गढी येथून आणलेल्या पवित्र मातीच्या कलशाचे पूजन करण्यात आले. हे कलश लाखो भाविकांच्या उपस्थितीत भक्ती शक्ती रथातून अमरावतीकडे मार्गस्थ झाले.

आमदार रवी राणा व खासदार नवनीत राणा, चंद्रकुमार जाजोदीया तसेच हनुमान चालीसा चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अमरावती येथील छत्री तलाव रोडवर हनुमान गढी येथे रामभक्त हनुमानाची १११ फूट भव्य उंच मूर्ती उभारण्यात येणार आहे. त्याच्या पायाभरणी समारंभात ही माती वापरली जाणार आहे. पायाभरणी समारंभात विविध मान्यवर संत, महंत यांच्या उपस्थितीत आंतरराष्ट्रीय शिवमहापुराण कथा वाचक प्रदीप मिश्रा यांच्या हस्ते या सर्व कलशातील पवित्र माती विधिवत पूजन करून हनुमंताला अर्पित केली जाणार आहे. रवी राणा यांनी अयोध्या येथे राम जन्मभूमी व पवित्र हनुमान गढी येथील माती संकलित केली होती. त्यावेळी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व हनुमान गढीचे महंत राजुदास महाराज यांनी हे पवित्र कलश आमदार रवी राणा यांच्या सुपूर्द केले होते. तिथून भक्ती-शक्ती रथामध्ये हे कलश श्री क्षेत्र उज्जैन येथील प्रभू श्री महाकाल मंदिरात ठेवण्यात आले होते. शनिवार २ डिसेंबर रोजी सकाळी ७ वाजता राणा दाम्पत्य हे हजारो भाविक भक्तांसह श्री महाकाल मंदिर प्रांगणात पोहचले.

सकाळी ७.१५ ला राणा दाम्पत्याच्या हस्ते महापूजा व अभिषेक झाला. ९ वाजता कलश पूजन झाले आणि ९.१५ वाजता श्री महाकाल मंदिरातील पुजारी व ट्रस्टी हे सर्व कलश विधिवत पूजन करून राणा दाम्पत्याच्या डोक्यावर ठेवले. हे सर्व मंगलमय कलश आपल्या डोक्यावर घेऊन राणा दाम्पत्याने मंदिर परिक्रमा केली. त्यानंतर हे कलश रथावर ठेवण्यात आले. या रथाला चंद्रकुमार जोजोदीया व त्यांच्या पत्नीने राणा दाम्पत्याच्या



उपस्थित भगवा झेंडा दाखवून मार्गस्थ केले. साडेअकरा वाजतापासून १५ दिवस चालणारी ही रथयात्रा इंदौर मार्गे ओंकारेश्वरकडे प्रयाण करेल. ओंकारेश्वर, खंडवा असे नगरभ्रमण करीत ही रथयात्रा अमरावती जिल्ह्यातील धारणी येथे प्रवेश करेल. नंतर ही रथयात्रा संपूर्ण अमरावती जिल्ह्यात फिरणार असून १३ दिवस भ्रमण करून१५ डिसेंबरला जिल्हा स्टेडियम अमरावती येथून निघणार्या शिवमहापुराण कथावाचक प्रदीप मिश्रा यांच्या कलश यात्रेत सामील होईल.

# लगीनसराईत सोने ६५ हजारांवर जाणार

## सोने-चांदीच्या बाजार भावात तेजी : मागणीही वाढणार

**दि४ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

वर्षभरात सोन्याच्या बाजारभावाने तिसऱ्यांदा ६३ हजारांचा टप्पा ओलांडला आहे. लगीनसराईमुळे सोने आणखी महाग होण्याची शक्यता सराफा व्यावसायिकांमधून वर्तविण्यात येत आहे.



भारतीयांचे स्वर्ण आभूषणांप्रतीचे प्रेम जगजाहीर असून, सोन्याचे दर कितीही वाढले तरी खरेदीत फारशी घट नसल्याचे दिसून येते. भारतातील सोन्याचा दर हा आंतरराष्ट्रीय घडामोडी आणि रुपयाच्या डॉलरसोबतच्या विनिमय दरावरून निश्चित होतो.सोन्या-चांदीच्या दरातील चढ- उताराचा फारसा परिणाम खरेदीवर होत नाही. अक्षय तृतिया, दसरा, दिवाळी या सणादरम्यान सोने खरेदीसाठी ग्राहकांची झुंबड उडते. आगामी काळ हा लग्नसराईच्या असल्यामुळे सोन्याचे भाव आणखी वाढण्याचा अंदाज वर्तविला जात आहे. गुंतवणुकीचा चांगला आणि खात्रीलायक पर्याय म्हणून गुंतवणूकदार हे सोने, चांदीमध्ये गुंतवणूक करतात. सोने-चांदीबाबत विशेष आकर्षण असल्यानेही अनेकजण खरेदीला पसंती देत असल्याने सराफा बाजारात तेजी दिसून येते. वाशिम जिल्ह्यात २ डिसेंबरला वाशिम येथे सोन्याच्या प्रती तोळा बाजारभावाने ६३ हजारांचा टप्पा ओलांडला होता. चांदीच्या बाजारभावातही तेजी असून, दि. १ डिसेंबरला प्रती किलो ७७ हजारांचा टप्पा ओलांडा होता.सन २०२३ या वर्षात तिसऱ्यांदा सोन्याच्या भावाने ६२ हजारांचा टप्पा ओलांडला. डिसेंबर महिन्यात तर ६३ हजार पार केले.

### भाव जाणार ६५ हजारांपर्यंत

सोन्याच्या भावात तेजी असल्याचे दिसून येते. आगामी लगीनसराईमुळे मागणी वाढण्याची शक्यता लक्षात घेता प्रती तोळा भाव ६५ हजारांपर्यंत जाण्याचा अंदाज सराफा व्यावसायिकांमधून वर्तविण्यात येत आहे. भाववाढ झाली तरी सोने खरेदीला पसंती असल्याचे दिसून येत आहे.

# 'मिचॉन्ग' चक्रीवादळामुळे महाराष्ट्रात २ दिवस मुसळधार पावसाची शक्यता

**दि.४ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

बंगालच्या उपसागरात गेल्या काही दिवसांपासून चक्रीवादळाचे संकट निर्माण झाले आहे. बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र तयार झाले आहे. अशा परिस्थितीत आता हे कमी दाबाचे क्षेत्र मजबूत होऊन रविवारी चक्रीवादळात रूपांतरित होण्याची शक्यता आहे. मिचॉन्ग चक्रीवादळामुळे पुढील दोन दिवस महाराष्ट्रात पावसाचा (महाराष्ट्र रेन अलर्ट) अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. बंगालच्या उपसागरात आज चक्रीवादळ निर्माण होण्याची शक्यता आहे. राज्यात अवकाळी पाऊस होताना दिसत आहे. अशा परिस्थितीत महाराष्ट्रातील कोणत्या ठिकाणांना 'मिचॉन्ग' चक्रीवादळाचा फटका बसणार आहे.



बंगालच्या उपसागरातील कमी दाबाचा परिणाम राज्यातील हवामानावरही दिसून येत आहे. राज्यात काही ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे. अवकाळी पावसाने राज्यातील शेतकरी संकटात सापडला आहे. अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. मात्र, काही भागात हवामान कोरडे राहील. मुंबई, ठाणे, पालघर परिसरात गारपीट होईल. कोकणातील किनारपट्टी भागात हवामान थंड राहील पुढील दोन दिवस राज्यात मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. मध्य महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाड्यात काही ठिकाणी वादळी वाऱ्यासह पाऊस पडण्याची शक्यता आहे. मध्यम ते हलका पाऊस अपेक्षित आहे. येत्या २४ तासांत विदर्भात मुसळधार पावसाची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. अशा परिस्थितीत या चक्रीवादळाचा महाराष्ट्रातील बहुतांश भाग प्रभावित होणार असल्याचे म्हणता येईल.



# कलश यात्रेत परमपूज्य श्री प्रदीपजी महाराज स्वत: पूर्ण वेळ राहणार उपस्थित

**दि.५विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

परमपूज्य श्री प्रदीपजी मिश्रा महाराज यांच्या सीहोर येथील आश्रमात भेट घेतली,महाराजांचे आशीर्वाद घेण्याचे सौभाग्य प्राप्त झाले तसेच हनुमान गढी अमरावती येथे होणाऱ्या शिवमहापुराण कथेसंदर्भात जवळपास ४ तास चर्चा झाली असून कथेची जय्यत तयारी सध्या सुरू आहे.

अमरावती शहरात आगामी१५ डिसेंबर रोजीहोणाऱ्या कलश यात्रेत परमपूज्य श्री प्रदीपजी महाराज स्वतः उपस्थित राहून पूर्णवेळ सहभागी होतील व या कलशयात्रेत ज्या महिला सहभागी होतील त्यांच्या साठी कथास्थळी विशेष स्वंतत्र आसनव्यवस्था सन्मानपूर्वक करावी अश्या सूचना परमपूज्य प्रदीपजी मिश्रा यांनी आमदार रवी राणा खासदार सौ नवनीत रवी राणा यांना केल्या,कलश यात्रेत सहभागी होणाऱ्या सर्व महिलांची सर्वात समोर बसण्याची वीआयपी कक्षात स्वतंत्र व्यवस्था करण्याचे अभिवचन यावेळी देण्यात आले.

# यंदा थंडी गायब! विदर्भात पाच वर्षांपूर्वी तापमानाचा निच्चांक

**दि.४विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

विदर्भात तापमानाचा पारा सर्वाधिक असताना याच विदर्भात हिवाळ्यात तापमानाचा पारा सर्वाधिक कमी झालेला सुध्दा दिसून आला आहे. मात्र, यंदा डिसेंबर उगवला तरी थंडीला सुरुवात झाली नाही. त्यामुळे यंदा विदर्भातून थंडी गायब झाली की काय, असा प्रश्न वैदर्भीयांना पडला आहे.

भारतीय हवामान खात्याने डिसेंबर महिन्यात थंडीला सुरुवात होईल असे सांगितले होते. मात्र, आता विदर्भाच नाही तर संपूर्ण महाराष्ट्रातच यंदा थंडी कमी राहील, असे सांगितले आहे. पाऊस कमी पडल्यामुळे किमान तापमान देखील अधिक राहील. सध्या विदर्भात अवकाळी पावसाने थैमान घातले आहे. त्यामुळे अचानक थंडी आणि अचानक उकाडा असे चित्र पाहायला मिळत आहे. गेल्या आठवड्यात केवळ दोन दिवस किमान तापमानात मोठी घट झाली होती. मात्र, आता पुन्हा थंडी गायब होऊन उकाडा जाणवू लागला आहे. विदर्भात पाच वर्षांपूर्वी याच डिसेंबर महिन्यात २०१८ साली ३.५ अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद करण्यात आली होती. मात्र, त्यानंतर कधीही तापमानाचा निच्चांक नोंदवला गेला नाही.

# तिसऱ्या टप्प्यात मनपा ने बजावली २६,१९१ मालमत्ता करधारकांना नोटीस

## 'जैसे थे' बांधकाम असलेल्या मालमतांचा समावेश

**दि.४विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

नव्याने मूल्यांकन झालेल्या मालमत्ताकराचे वाटप तीन टप्यात करण्यात येत असून, तिसऱ्या टप्यातील 'जैसे थे' बांधकाम असलेल्या ५७ हजार ४८६ पैकी २६ हजार ९११ मालमत्ताधारकांना नोटीस वाटप झाले आहे. दरम्यान, सर्व नोटीस वाटप झाल्यावरच पाचही झोनमधील मालमत्ताधारकांच्या करआकारणीची अंतिम यादी प्रसिद्ध केल्या जाणार आहे.



महापालिकेने नव्याने कर मूल्यांकन केल्यानंतर पहिल्या टप्प्यात आतापर्यंत एकदाही कर आकारणी न झालेल्या किंवा नव्या ४६ हजार ७२६ इमारतींना कराची नोटीस दिली. दुसऱ्या टप्यात वाढीव बांधकाम किंवा नुतनीकरण केलेल्या १ लाख ६ हजार ७३८ मालमत्ताधारकांना नोटीस देण्यात आली. आता ज्या मालमत्ताधारकांच्या बांधकामात कोणताही बदल झालेला नाही, त्या ५७ हजार ४८६ मालमत्तांना नोटीस वाटण्यात येत आहे. या यापैकी झोन राजापेठ अंतर्गत तिन्ही टप्यातील मालमत्ता नोटीसचे वितरण झाले असून, अन्य झोनमध्ये मात्र तिसऱ्या भागातील वितरण अद्याप बाकी आहे. मालमत्ता करांच्या नोटीस वाटप करतानाच मालमत्ताधारकांच्या आक्षेपांवर सुनावणी घेतल्या जात आहे. तसेच सुनावणी पूर्ण झालेल्या मालमत्ताधारकांच्या कराची नोटीस अंतिम करण्यात येत आहे.पाचही झोनमधील सर्व मालमत्ताधारकांच्या कराची अंतिम नोटीस एकदाच जाहीररित्या प्रसिद्ध करण्यात येणार आहे; मात्र मालमत्ता करवाढ अवास्तव झाल्याचा आरोप करून विविध राजकीय संघटना व पक्षांकडून या करवाढीला विरोध केल्या जात आहे. अगदी शहरातील जनप्रतिनिधींनीही अशाप्रकारे करवसुली करू नये, अशा सूचना प्रशासनाला केल्या होत्या. त्यामुळे सध्या ही प्रक्रिया काहीशी संथगतीने सुरू असल्याचेही चित्र आहे. दरम्यान, काही दिवसांपूर्वीच जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी महापालिकेत आढावा बैठक घेतली: परंतु त्यामध्ये मालमत्ता करवाढीबाबत कोणतीही चचर्चा झाली नाही, हे विशेष.

# शहरातून पुन्हा दोन अल्पवयीन मुली बेपत्ता

**दि४विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

युवतींचे बेपत्ता होण्याचे सत्र शहरात सुरूच असून रविवारी पुन्हा घरातून निघून गेलेल्या दोन युवती घरी परतल्याच नाही. त्यांचे कुणीतरी अपहरण केले असावे, असा संशय व्यक्त करीत कुटुंबियांनी पोलिसठाण्यात तक्रारी दाखल केल्या आहे. दोन्ही घटना गाडगेनगर पोलिसठाण्याच्या हद्दीतील आहेत. दोन्ही मुली अल्पवयीन आहेत. आशियाड कॉलनी परिसरात राहणारी १७ वर्षीय युवती शिकवणीसाठी जाण्याचे सांगून पुन्हा घरी परतलीच नाही, ती तिच्या मावशीकडे राहत होती. याप्रकरणी युवतीच्या भावाने तक्रार दाखल केली असून कुणीतरी तिचे अपहरण केले असावे, असा संशय व्यक्त केला आहे. दुसऱ्या एका घटनेत एक १५ वर्षीय मुलगी आपल्या नवसारी भागात राहणाऱ्या बहिणीच्या घरुन गावी जाण्यासाठी निघाली होती; मात्र ती आपल्या गावी पोहोचलीच नाही, याप्रकरणात ४० वर्षीय महिलेने दाखल केलेल्या तक्रारीवरुन पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

# बलात्कारा विरुद्ध ची लढाई लढणारे नाटक - 'संघर्ष'

**दि.४ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

६२ व्या महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धे मधे अमरावती केंद्रावरील प्राथमिक फेरीत आज दि. २ डिसेंबर,रोजी योगेश सोमण लिखित आणि प्रसाद खरे दिग्दर्शीत संघर्ष नाटक सादर करण्यात आले. अमरावती मधे सुरु असलेल्या या प्राथमिक फेरीला रसिकांचा प्रतिसाद दिवसेंदिवस वाढतोच आहे. सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार आणि संचालक सांस्कृतिक कार्य बिभीषण चावरे यांचे मार्गदर्शनात स्पर्धेची ही प्राथमिक फेरी संपूर्ण महाराष्ट्रात सुरु असून या मालिकेत आज संघर्ष या नाटकाच्या सादरीकरणाने आणखी एक पुष्प ओवल्या गेले. पडदा उघडतो आणि दिसते ते मेजर साठे यांच घर आणि हॉल मधे कोणाचीतरी वाट पाहणारे सेवानिवृत्त मेजर. थोड्याच अवधित रंगमांच्यावर प्रवेश घेते एक अनोळखी मुलगी जुई जी थोडीशी आगाऊ वागणारी आणि अटीट्युड दाखणारी असते. त्या दोघात थोडा संवाद होतो आणि आतल्या खोलीत जुई झोपायला निघून जाते आणि मेजर साठे समोरच्या हॉल मधे झोपतात. अस्वस्थ असणारी जुई या वेळ पर्यन्त तणावात वावरताना दिसते



आणि अचानक ती समोरच्या हॉल मधे येते, तिथला फोन घेऊन वडील - आई सोबत बोलते, रडायला लागते आणि तशीच पुन्हा हॉल मधे वापस येते. प्रेक्षकांची उत्कंठा आतापर्यंत ताणली गेली असते आणि मेजर साठे यांनी धीर दिल्यावर ती मन मोकळ करते आणि त्यांना सांगते की परवाच तिच्यावर सामूहिक अत्याचार झाला आहे आणि त्याची वाच्यता नको म्हणून तिच्या वडिलांनी तिला पारगावी पाठवून दिले आहे. मग मेजर साठे तिला धीर देतात आणि तिच्या अन्याया विरुद्ध च्या तिच्या लढाईत सामील होतात. या विरुद्ध जुई चे वडील तिला केस परत घेण्यासाठी आग्रह धरतात आणि संघर्ष सुरु होतो. सूचक नेपथ्य, नेमकं संगीत आणि प्रकाशयोजना या नाट्यकृतीत रसिकांना अनुभवायला मिळाली. योगेश सोमण लिखित आणि प्रसाद खरे दिग्दर्शीत संघर्ष या नाटकाची निर्मिती स्यमंतक बहूउद्देशीय संस्था , अमरावती यांची आहे. तांत्रिक बाजू म्हणजे नेपथ्य आणि रंगाभूषा - निलेश ददगाळं-गायत्री खरे यांनी तर संगीत- अक्षय वैद्य - प्रणव कोरे, रंगमंच व्यवस्था - राहुल वासनकर प्रकाश योजना - गजेंद्र मेटे- ऋषिकेश भागवतकर वेशभूषा - रसिका वैष्णव, रंगमंच व्यवस्था - गौरी अभ्यंकर - मिलिंद कहाळे यांनी सांभाळली. आजच्या या नाट्यकृतीत जवळपास १०कलावंतांनी भूमिका साकारल्यात. मेजर - शशांक देशपांडे, जुई - सिद्धी देशपांडे, विनायक - निखिल सखे, भाऊसाहेब - अथर्व शाळीग्राम, वकील - प्रसाद खरे, कमांडो - माधुर्य ठाकरे, आरोपी क्र. १,२ आणि ३ - अनुक्रमे योगेश जाधव, अनुराग वारेकर आणि धानोडकर यांनी भूमिका साकारल्यात.

# मला पण सत्तेत जाण्याचा चान्स होता पण मी गेलो नाही : रोहित पवार

**दि. ४ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

सत्तेत जणांचा चान्स मला पण होता पण मी गेलो नाही. मी व्यवसायात आहे, मला पण व्यवसायात फायदा झाला असता, माझ्यावर जी कारवाई झाली ती झाली नसती. पण आम्ही वेगळी भूमिका घेतली. आम्हाला माहीत होतो की बीजेपी स्ट्राँग आहे त्यांच्याकडे जास्त पैसा आहे. सर्व यंत्रणा आहे ,तरी पण आम्ही लोकांसोबत राहिलो. त्यामुळे आज मी लढण्यासाठी तयार आहे आम्ही याही परिस्थितीत लढत आहोत.



पक्ष हा केंद्रबिंदू ठेवला पाहिजे जे कार्यकर्ते आहे त्यांना न्याय मिळाला पाहिजे त्यांना सगळ्यांना विश्वासात घेऊन काम केलं तर एक सेंट्रलाइज सिस्टीम तयार होईल. चांगली संघटना तयार होईल. त्यामुळे हे जे काही नेते आहेत त्यांना स्वताला असं वाटतं की त्यांच्यामुळेच पार्टी आहे त्यांचा फरक होऊ शकत नाही येत्या काळामध्ये काही बदल तुम्हाला दिसून येईल.

२००९ मध्ये भाजपचे मोठी नेते बैलबंडीभर पुरावे घेऊन अधिवेशनावर गेले होते, पण अजून पर्यंत त्या बैलबंडीमध्ये मला पुरावे दिसले नाही. त्यामुळे भाजप सोयीचे राजकारण होत आहे राजकारण करत आहे.

# दिव्यांगांनी शासनाच्या योजनांचा व आधुनिक साधनांचा लाभ घ्यावा : किशोर बोरकर

**दि.४विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

दिव्यांग बांधवांना निसर्गाने दिव्यांगत्व जरी दिव असेल मात्र गुणवत्तासुध्द निसर्गानेच दिली आहे. दिव्यांग पूर्वाजन्माचे पाप आहे, ह अंधश्रद्धेतून लोकभाषेची म्हण आत दिव्यांग बांधवांनी पार पुसून काढली आहे. दिव्यांग बांधव आता आयएएस सुध्दा झालेले आहेत. उत्कृष्ट उद्योजक, नामवंत लेखक, साहित्यिक, कलाकार आदी क्षेत्रात दिव्यांग बांधवांनी उल्लेखनीय कार्य केले आहे. जागतिक सुविख्यात हेलन किलर यांचे उदाहरण




आपल्यासमोर असून आपणसुध्दा या सर्वांचा आदर्श आपल्या समोर ठेवून शासनाच्या योजनांचा व उपलब्ध आधुनिक साधनांचा उपयोग करून आपले जीवन सुकर करावे, असे विचार आदर्श जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राचे संचालक किशोर बोरकर यांनी केले.

स्थानिक नवाथेनगर येथील आदर्श जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्रात अमरावती येथे जागतिक दिव्यांग दिनी आयोजित दिवाळी मिलन सोहळयात किशोर बोरकर बोलत होते. समाजाचा दिव्यांग य बांधवांकडून बघण्याचा व्य दृष्टीकोन सकारात्मक असून शासनाने दिव्यांग बांधवांना सोईसुविधा मिळवून देण्यासाठी अधिकाऱ्यांना शासन निर्णय करूनदिलेले असताना काही अधिकारी मात्र दिव्यांग बांधवांना सोईसुविधा मिळवून देण्यासाठी नकारात्मक भूमिका घेतात. शासनातील बरेच अधिकारी दिव्यांग बांधवांना सोईसुविधा मिळवून देण्यासाठी सकारात्मक असल्यामुळे बऱ्याच दिव्यांगांना सोईसुविधांचा लाभ मिळालेला आहे, असेही बोरकर म्हणाले.

याप्रसंगी अजिंक्य देशमुख, फुलचंद पाटील, नितीन पाचकवडे या दिव्यांग बांधवांनी आपले विचार व्यक्त केले. प्रकल्प संचालक राजू कोडे यांनी प्रास्ताविकातून जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राची माहिती दिली.कार्यक्रमाला प्रा. कोल्हे, अभिषेक अलकरी, राजकुमार गुल्हाने, सौ. तानोळकर, कु. नेहा येवतीकर व दिव्यांग बांधवांचे पालक उपस्थित होते.

# पेपर तपासणी मूल्य, मानधन वाढवा विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे शिक्षण मंडळाला निवेदन

**दि.४विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या राज्यातील सर्वच केंद्रांवर काम करणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मानधन व पेपर तपासणी मूल्यांमध्ये वाढ करण्याची मागणी विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाने केली. यासंदर्भातील लेखी निवेदन राज्य शिक्षण मंडळास सादर करण्यात आले.

अनेक वर्षांपासून शिक्षण मंडळामध्ये परीक्षा केंद्रावर काम करणारे केंद्र प्रमुख, उपकेंद्र प्रमुख, पर्यवेक्षक, कारकून व सफाई कामगार आणि नियामक यांच्या मानधनात वाढकरण्यात आली नाही. पेपर तपासणी करणाऱ्या यंत्रणेतील समीक्षक व परीक्षकांचे पेपर तपासणी मूल्य वाढविण्यात आले नाही, विद्यार्थ्यांच्या शुल्कामध्ये मात्र भरमसाठ वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे सध्याची महागाई लक्षात घेता केंद्र प्रमुख, उपकेंद्र प्रमुख, पर्यवेक्षक, कारकून व सफाई कामगार आणि नियामक यांच्या मानधनात तसेच समीक्षक व परीक्षक यांचे पेपर तपासणी मूल्य वाढवावे, याबाबतचे निवेदन विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे प्रांतीय अध्यक्ष एस. जी. बरडे यांनी राज्य शिक्षण मंडळाच्या अध्यक्ष,सचिवांकडे अमरावती विभागीय शिक्षण मंडळामार्फत २८ नोव्हेंबरला पाठविले.

निवेदन अमरावती विभागीय शिक्षण मंडळाचे सहसचिव तेजराव काळे यांनी स्वीकारले. बरडे यांच्यासह विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष दशरथ रसे, महानगर कार्यवाह अरविंद चौधरी, जिल्हा सहकार्यवाह गजेंद्र शेंडे व महानगर संघटक हर्षवर्धन देशमुख उपस्थिता होते.

# प्रवाशांनो... एसटी बस थांब्यावर ३० रुपयांत चहा-नाश्ता मिळतो का?

## प्रवासी अनभिज्ञ : जास्त दर लागल्यास करता येते तक्रार

**दि४ विदर्भ प्रजासत्ताक**
**अमरावती**

एसटी बसने प्रवास करीत असताना ठरावीक काही बसथांब्यांवर एसटी थांबवून चहा-नाश्ता करण्यासाठी १० ते १५ मिनिटांचा वेळ चालक-वाहकांकडून दिला जातो. त्याठिकाणी ३० रुपयांत चहा-नाश्ता मिळणे अपेक्षित आहे. अधिक दर आकारल्यास तक्रार करता येते. मात्र, अधिकांश प्रवासी या अधिकाराबाबत अनभिज्ञ आहेत.



सुरक्षित प्रवास म्हणून आजही एसटीलाच विशेष प्राधान्य दिले जाते. याशिवाय महिलांना तिकीटदरात ५० टक्के सवलत, वयोवृद्धांना मोफत प्रवासाची सुविधा असल्याने सर्वच मार्गावरील एसटी बसेसमध्ये तुलनेने अधिक गर्दी राहत आहे. दरम्यान, लांबच्या प्रवासाला निघालेली एसटी ठरावीक बस थांब्यांवर थांबवून चहा- नाश्ता करण्यासाठी वेळ दिला जातो. त्याठिकाणी ३० रुपयांत चहा-नाश्ता द्यावा, असा नियम आहे. त्याचे उल्लंघन झाल्यास प्रवासी तक्रार करू शकतात. एसटीच्या प्रवाशांसाठी करार करण्यात आलेल्या हॉटेलांमध्ये शिरा, पोहे, उपमा, वडा पाव, इडली आदींपैकी कुठलाही एक पदार्थ आणि चहा ३० रुपयांत मिळणे अपेक्षित आहे.

**हेल्पलाइनवर करा कॉल**

एमएसआरटीसी'कडून करारबद्ध करण्यात आलेल्या हॉटेलांमध्ये जास्त पैसे मोजावे लागत असल्यास महाराष्ट्र राज्य एसटी महामंडळाच्या हेल्पलाईनवर तक्रार करता येते.

# संत्रा प्रकल्पाच्या ८ वेळा घोषणा करून एकही संत्रा प्रकल्प अस्तित्वात नाही

## शासनाच्या उदासीन धोरणामुळे संत्रा उत्पादक शेतकरी संकटात

**दि४ विदर्भ प्रजासत्ताक**
**मोर्शी**

विदर्भात एवढ्या वर्षांत आज पर्यंत एकही यशस्वी संत्रा प्रक्रिया प्रकल्प सरकारला उभारता आला नाही ही शोकांतिका आहे, विदर्भातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना फक्त तारीख पे तारीख देऊन सन १९५७, १९६३, १९९२, १९९५, २०१४, २०१७, २०१९, २०२१ च्या अर्थसंकल्पात संत्रा प्रक्रिया प्रकल्पाची घोषणा करून विदर्भातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांची फसवणूक केल्या गेली आहे. संत्रा प्रकल्पासाठी केल्या गेलेल्या या तारखा आणि घोषणा कधीच फळाला आल्या नाहीत. काही प्रकल्प सुरू होण्याच्या आधीच सुपडासाफ झाले. तर काही हवेतल्या हवेतच गायब झाले असल्यामुळे संत्रा उत्पादक शेतकऱ्यांचा शासनाच्या पोकळ आश्वासनांवर आता विश्वास राहिलेला नाही.






बांगलादेश सरकारने भारतीय संत्र्यावर मोठ्या प्रमाणात आयात शुल्क आकारण्यास सुरुवात केल्यानंतर अमरावती जिल्ह्यात मोर्शी वरूड चांदुर बाजार,अचलपूर, तिवसा, नागपूर जिल्ह्यातील नरखेड, काटोल, कळमेश्वर येथून होणारी संत्र्याची निर्यात ठप्प झाल्यामुळे संत्र्याचे भाव गडगडले आणि संत्र्याच्या अर्थकारणावर त्याचा विपरीत परिणाम झाला.बांगलादेशने संत्र्यावरील आयात शुल्क कमी करावे, यासाठी केंद्र सरकारने बांगलादेश सरकारशी चर्चा करावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका उपाध्यक्ष रुपेश वाळके यांनी रेटून धरली होती. आता संत्र्याच्या आयात शुल्कातील ५० टक्के प्रतिपूर्ती राज्य शासन करणार असल्याची घोषणा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. त्यातून संत्रा उत्पादकांना दिलासा मिळू शकेल का हा मुद्दा चर्चेचा ठरणारा आहे.

अमरावती जिल्ह्यातील मोर्शी वरूड तालुका हा संत्रा विक्रमी संत्रा उत्पादनासाठी प्रसिद्ध असून विदर्भाचा कॅलिफोर्निया म्हणून ओळखल्या जात असून आशीया खंडातील सर्वात जास्त पिकविला जाणाऱ्या मोर्शी वरूड तालुक्यातील नागपुरी संत्राने वेगळी ओळख निर्माण केली आहे. मोर्शी वरूड तालुक्यात ४७ हजार हेक्टरमध्ये मोठ्या प्रमाणात संत्र्याचे विक्रमी उत्पादन घेतले जाते. परंतु मोर्शी वरूड तालुक्यात कुठेच संत्रावर प्रक्रिया करणारा प्रकल्प नाही, कोल्डस्टोरेज व वेअर हाऊस सुविधा नाही, तसेच संत्रा व मोसंबीवर प्रक्रिया करणाऱ्या केंद्राची वाणवा असल्याने शसानाच्या उदासीन धोरणामुळे शेतकऱ्यांना त्यांचा माल कवडीमोल भावात विकावा लागत असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका उपाध्यक्ष रुपेश वाळके यांनी केला आहे. शासनाच्या उदासीन धोरणामुळे विदर्भ संत्राफळांच्या उत्पादनात माघारत आहे. उत्पादन चांगले असले तरी भाव मिळत नाही. शेती उद्योग प्रयोगशील असला पाहिजे. संत्री टेबल फ्रूट असून, चव चांगली आहे. यामुळेच ती जगात पोहचविणे गरजेचे आहे. सिंगापूर, बांग्लादेश, दुबईसारख्या देशांत संत्री कंटेनरने पोहचविण्याचा प्रयत्न सरकार तर्फे करणे गरजेचे आहे. बांग्लादेशात शेतकऱ्यांचे शिष्टमंडळ पाठवून बाजारपेठेची माहिती घेऊन त्यानुषंगाने वरूडमध्ये राज्यातील पहिला डीहायड्रेशन प्रकल्प उभारून संत्री डीहायड्रेट करून विकली जातील. मोर्शीमध्ये संत्रा रस प्रक्रिया केंद्र सुरू करून त्याचे देशात विपणन करण्यासाठी ब्रँड निर्माण केला जाईल, असे ठोस आश्वासन उपस्थित शेतकऱ्यांना उद्घाटनप्रसंगी तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले होते. ते आश्वासन हवेतच विरले असून, त्यानंतरच्या सहा वर्षांच्या काळात याबाबत कुणी 'ब्र' हीकाढलेला नाही. कोकाकोला आणि जैन इरिगेशनचा संयुक्त प्रकल्प मोर्शी तालुक्यातील हिवरखेड (ठाणाठुणी) येथे साकारण्यात आला. परंतु, सहा वर्षाच्या काळामध्ये जैन फार्म फ्रेश संत्रा उन्नती प्रकल्ल शासनाच्या उदासीन धोरणामुळे पूर्णत्वास जाऊन न शकल्यामुळे मोर्शी वरूड तालुक्यातील हजारो संत्रा उत्पादकांचा हिरमोड झाला असून आता पुन्हा आता संत्र्याच्या आयात शुल्कातील ५० टक्के प्रतिपूर्ती राज्य शासन करणार असल्याची घोषणा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली असून शेतकऱ्यांच्या विकासासाठी एकत्र आलेले मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या व्यथा समजून घेऊन ८ वेळा घोषणा केलेल्या अत्याधुनिक संत्रा प्रक्रिया प्रकल्पाची घोषणा नागपूर येथे होणाऱ्या हिवाळी अधिवेशनात करून त्यावर निधी मंजूर करून पूर्णत्वास नेतील का याकडे विदर्भातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

# कारागृहात चेंडू फेकून चॉकलेटसह गांजाचाही पुरवठा

## गेल्या काही दिवसांत कारागृहाच्या आवारात चेंडू फेकण्याच्या घटनांमध्ये वाढ

**दि४ विदर्भ प्रजासत्ताक**
**अमरावती :**

येथील मध्यवर्ती कारागृहात अमली पदार्थ पुरविण्यासाठी वेगळ्याच पद्धतीचा वापर केला जात असून कारागृहाच्या आवारात अमली पदार्थाने भरलेले चेंडू फेकण्याच्या अनेक घटना गेल्या काही दिवसांत निदर्शनास आल्या आहे. आता पुन्हा एकदा प्लास्टिक टेपने गुंडाळलेला चेंडू फेकण्यात आला. या चेंडूत चक्क गोड सुपारी, चॉकलेट, काजळाची डबी, नागपुरी खर्रा आणि गांजासारखा पदार्थ आढळून आला आहे. या प्रकारांनी कारागृह प्रशासन देखील चक्रावून गेले आहे.

कारागृहातील पोलीस शिपाई मंगेश सोळंके हे सेवेवर असताना त्यांना १४ क्रमांकाच्या बॅरेकमधील टिनाच्या शेडवर काहीतरी पडल्याचा आवाज आला. त्यांना त्या ठिकाणी प्लास्टिकच्या पिशवीत गुंडाळलेला एक चेंडू आढळून आला. त्यांनी लगेच या प्रकाराची माहिती वरिष्ठांना कळवली. मध्यवर्ती कारागृहाच्या अधीक्षक कीर्ती चिंतामणी यांना देखील याविषयी सविस्तर माहिती देण्यात आली.त्यानंतर कीर्ती चिंतामणी यांच्या आदेशानुसार त्यांनी फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पंचांसमक्ष जेव्हा या चेंडूचे निरीक्षण करण्यात आले, तेव्हा त्यात गोड सुपारी, पाच सेंटर फ्रूट चॉकलेट, किकी काजळाची डबी, प्लास्टिकमध्ये गुंडाळलेला नागपुरी खर्रा, मुरूमाचा दगड आणि एका प्लास्टिकच्या पिशवीमध्ये सुकलेला काळसर हिरव्या रंगाचा गांजासारखा अमली पदार्थ आढळून आला. या प्रकरणी फ्रेजरपुरा ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. गेल्या काही दिवसांत कारागृहाच्या आवारात चेंडू फेकण्याच्या घटनांमध्ये वाढ झाल्याने कारागृहातील सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# 'एमपीएससी', 'पीडब्ल्यूडी'ची परीक्षा एकाच दिवशी! उमेदवारांमध्ये संभ्रम

**दि.४विदर्भ प्रजासत्ताक**
**अमरावती :**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची (एमपीएससी) महाराष्ट्र अराजपत्रित गट-ब आणि गट-क सेवा संयुक्त मुख्य परीक्षा येत्या १७ डिसेंबरला नियोजित आहे. मात्र, याच दिवशी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या (पीडब्ल्यूडी) स्थापत्य अभियांत्रिकी पदाची परीक्षा देखील आहे. दोन्ही परीक्षा एकाच दिवशी आल्याने उमेदवारांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून अराजपत्रित गट-ब आणि गट-क सेवा संयुक्त पूर्वपरीक्षेचा निकाल १२ सप्टेंबरला जाहीर करण्यात आला. एमपीएससीच्या मुख्य परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या अनेक उमेदवारांनी बांधकाम विभागाच्या अभियांत्रिकी पदाच्या परीक्षेसाठीही अर्ज केले आहेत. अनेक विद्यार्थ्यांना त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना एका परीक्षेची संधी गमवावी लागणार आहे. दोन्ही परीक्षांच्या तारखेत बदल करण्याची मागणी उमेदवारांकडून केली जात आहे.

# कुलगुरुपदांच्या अर्जाची छानणी सुरु पुण्यात निवड समितीची पहिलीच बैठक

## नवव्या कुलगुरू पदांसाठी एकूण ११७ अर्ज, पात्र उमेदवारांची यादी होणार तयार




### अपात्र अर्ज होणार बाद, 'शॉर्ट लिस्ट'कडे लक्ष

अमरावती विद्यापीठाच्या कुलगुरुपदांसाठी ११५ अर्जाची समितीकडून छानणी केली जाईल. त्यात अपात्र उमेदवारांचे अर्ज बाद झाल्यानंतर पात्र उमेदवारांची यादी तयार केली जाईल. अर्जाची बारकाईने छानणी करण्याचे नियोजन समितीने केले आहे. त्यामुळे ११५ पैकी किती अर्ज बाद होतात, याकडे नजरा लागल्या आहेत. मात्र, सरतेशेवटी पाच उमेदवारांच्या 'शॉर्ट लिस्ट' मध्ये कुणाची नावे राजभवनाकडे जातात, यावर कुलगुरूपदांचे समीकरण जुळणार आहे.

**दि.४विदर्भ प्रजासत्ताक**
**अमरावती**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या नवव्या कुलगुरू पदांसाठी एकूण ११५ उमेदवारांनी अर्ज सादर केले आहे. त्याअनुषंगाने आ सोमवार येथे कुलगुरू निवड समितीची बैठक होऊ घातली असून पात्र उमेदवारांच्या अर्जाची यादी तयार केली जाणार आहे. तत्कालीन कुलगुरू डॉ. दिलीप सदस्यीय समितीचे गठन केले आहे.

मालखेडे यांचे दुर्धर आजाराने निधन झाले. त्यामुळे अमरावती विद्यापीठात या रिक्त कुलगुरूपदासाठी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली असून, शैक्षणिक पात्रता असलेल्या उमेदवारांकडून मेलद्वारे अर्ज मागविण्यात आले आहे तसेच शासनाने अमरावती विद्यापीठाच्या नवीन कुलगुरू निवडीसाठी चार सदस्यीय समितीचे गठन केले आहे.त्यात अध्यक्षपदी कानपूर येथील आयआयटीचे डॉ. संजय धांडे तर सदस्य म्हणून सुरत येथील एसव्हीएनआयटीचे डॉ. अनुपम शुक्ला, लखनौ विद्यापीठाचे डॉ. मनोज दीक्षित तर नोडल अधिकारी म्हणून पुणे येथील शासकीय अभियांत्रिकीचे डॉ. सुजित परदेशी यांचा समावेश असल्याची माहिती आहे. या निवड समितीकडे कुलगुरूपदांसाठी शैक्षणिक पात्रताअसलेल्या ११५ उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज सादर केले आहे.डिसेंबरअखेर अमरावती विद्यापीठात नव्या कुलगुरूंची नियुक्ती करणे आवश्यक असल्याने समितीने अर्ज छाननीचा सोमवारी पहिला टप्पा हाती घेतला आहे. या निवड समितीच्या बैठकीला अमरावती विद्यापीठातून मंगेश वरखडे हे गेल्याची विश्वसनीय माहिती आहे.

# विद्युत प्रीपेड स्मार्ट मीटरला विदर्भ राज्य आंदोलन समितीचा विरोध

**दि.४विदर्भ प्रजासत्ताक**
**अमरावती**

महाराष्ट्र वीज वितरण कंपनीद्वारे विद्युत प्रीपेड स्मार्ट मीटर बसविण्यात येत आहे. यामुळे वीज ग्राहकांना प्रचंड आर्थिक भुर्दंड सहन करावा लागणार आहे. त्यामुळे विदर्भ जनआंदोलन समितीने या मीटरला तीव्र विरोध केला आहे. राज्य आंदोलन समितीच्यावतीने अधीक्षक अभियंता विद्युत प्रीपेड स्मार्ट मीटर विनामूल्य



मिळणार, अशा बातम्या वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या, त्याचप्रमाणे देशातील अग्रगण्य इंग्रजी वृत्तपत्रातून विनामूल्य मिळण्याची बातमी प्रकाशित झाली. सदर प्रकरणी अशा प्रकारचे आदेश आपल्या वीज विद्युत कंपनी अमरावतीला प्राप्त झाले काय ? झाले असल्यास त्यासंबंधी माहिती द्यावी, अशाआशयाचे निवेदन देण्यात आले. मागच्या सरकारनेसुद्धा कोरोना काळात वीजबिल माफ करण्यात येईल अशी घोषणा केली; परंतु रखरखत्या उन्हात भर उन्हाळात बीज कनेक्शन कापण्यात आले होते. ही बाब अधीक्षक अभियंत्याना निदर्शनात आणून देताच, त्यांनी कंपनीचा तसा करार झाला असून विद्युत स्मार्ट मीटर विनामूल्य मिळणार आहे. कोणत्याही प्रकारे मीटरची किंमत ग्राहकाकडून वसूल केली जाणार नाही. रात्रीचा रिचार्ज संपला तरी रात्रीला वीजपुरवठा खंडित होणार नाही, असे मौखिकरित्या सांगितले, तसेच सदर कराराची प्रत उपलब्ध करून देण्याचे अभिवचन दिले. निवेदन देताना जिल्हाध्यक्ष राजेंद्र आगरकर, शहराध्यक्ष रियाज खान, रहमानमाई, सत्यप्रकाश गुप्ता, अफसरमाई, मनोज पोपटानी, लक्ष्मण वानखडे, अनिल वानखडे, वसीम शहा, किसनराव मोकळकर आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# फरशी स्टॉप व दस्तुरनगर चौक परिसरात अतिक्रमण निर्मूलनाची कार्यवाही

**दि.४ विदर्भ प्रजासत्ताक**
**अमरावती**

महानगरपालिके तर्फे अतिक्रमण निर्मूलन मोहीम राबविण्यात येत आहे. शहरातील रस्त्यांवर अस्थायी स्वरुपाचे अतिक्रमण असल्यामुळे शहरात अतिक्रमण निर्मूलनाची मोहीम राबविण्यात येत आहे.मनपा आयुक्त देविदास पवार यांच्या आदेशाने सोमवार दिनांक ४ डिसेंबर,२०२३ रोजी पशुशल्य चिकीत्सक डॉ.सचिन बोंन्द्रे, अतिक्रमण पथक प्रमुख उमेश सवाई, योगेश कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागामार्फत फरशी स्टॉप, दस्तुरनगर चौक येथे अतिक्रमण निर्मूलनाची कार्यवाही करण्यात आली. सदर ठिकाणी रोडच्या दोन्ही बाजूंनी अतिक्रमण निर्मूलनाची कार्यवाही करण्यात आली. सदर ठिकाणी जेसीपीद्वारे अतिक्रमण निर्मूलनाची कार्यवाही करण्यात आली. यावेळी मटणाची दुकाने हटविण्यात आली असून साहित्य जप्त करण्यात आले.महानगरपालिके तर्फे अतिक्रमण निर्मूलनाची मोहीम राबविण्याचा निर्णय मनपा आयुक्त देविदास पवार यांनी घेतला. अनधिकृत आणि वाहतुकीस अडथळा करणाऱ्या अतिक्रमणांवर कारवाईची मोहीम सुरू करण्यात आली.

सर्व अतिक्रमण धारकांना सूचित करण्यात येते की, मुख्य मार्गावर, नालीवर, फूटपाथवर हातगाड्या, खोके, भाजीपाला दुकाने विनापरवानगी लावण्यात येऊ नये अन्यथा अतिक्रमण विभागातर्फे अतिक्रमण काढण्याची कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर कार्यवाहीत अतिक्रमण विभागाचे कर्मचारी व पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

# वरुड तालुक्यात ३५ गावातील नागरिकांचे पाण्यासाठी लाक्षणीक उपोषण

## आमदार देवेंद्र भुयार यांनी काम बंद केल्याचा आरोप : पाणी पुरवठा योजना काम बंद केल्याने गावकरी संतप्त

**दि.४विदर्भ प्रजासत्ताक**
**अमरावती**

अमरावती जिल्ह्यातील वरुड तालुक्यात आमदार देवेंद्र भुयार यांच्या विरोधात ३५ गावातील नागरिक आक्रमक झाले आहेत. मोर्शी वरुड विधानसभा मतदार संघातील वरुड तालुक्यात ३५ गावात पाणी पुरवठा करण्यासाठी पंढरी ३५ गावे पाणीपुरवठा योजनासाठी १०१ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला होता. या



योजनेचे काम जवळपास ६० टक्के काम पूर्ण झाले आहे. या पाणी पुरवठा योजनेच्या माध्यमातून ३५ गावांचा पाणी प्रश्न मिटून नागरिकांना शुद्ध पाणी पुरवठा होणार होता. मात्र आमदार देवेंद्र भुयार यांनी जाणीवपूर्वक स्वतःला कमिशन न मिळाल्याने ही योजना बंद केली असा आरोप करीत पंचायत समितीचे माजी सभापती विक्रम ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली ३५ गावातील नागरिकांनी एकदिवशीय लाक्षणिक उपोषण सुरू केले आहे.या योजनेचे काम तात्काळ सुरू करा अन्यथा तीव्र आंदोलन करू असा इशारा विक्रम ठाकरे यांनी दिला.